This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

Checked 2012

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
हस्तलिखित संग्रह

दाखल क्र M696 विषय पुराण
नाव. गायत्रीपुराण (अपूर्ण) (मराठीआर्षीय)
लेखक/लिपीकार _____
पृष्ठ 23 काळ सन 1911 पूर्ण/अपूर्ण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ अथ गाइत्रीपुराण प्रारंभः ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीगणेशायनमः॥श्रीसरस्वत्यैनमः॥श्रीमातापितृभ्यांनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः॥श्रीकुलदेवतायै
नमः॥श्रीशंकरायनमः॥ जयजयश्रीआदिपुराण ॥ चारवेदांचेंनिर्वाण ॥सकलशास्त्रांचेंजीवन ॥
आदिबीजतूं ॥ १ ॥ तूंचारीवेदांचेंजिव्हार ॥ सहाजणांचेंनिजघर ॥ अठराहोऊनिनिर्भर ॥ स्त
वितीतुज ॥ २ ॥ ब्रह्माविष्णुशंकर ॥ तुजसमजतीनिरंतर ॥ जीअनादिमायासाचार ॥ तेही
स्तवितीतुजलागीं ॥ ३ ॥ चंद्रसूर्यतारागण ॥ मरुद्गणपितृगण ॥ ऋषीसंपूर्णआदिकरून ॥
थोरलहानध्यानकरिती ॥ ४ ॥ असोहेंगाइत्रीपुराण ॥ प्रारंभींउद्भवलेंकोठोन ॥ कथासांग
तोंमुळापासोन ॥ ऐकालावूनचित्तवृत्ती ॥ ५ ॥ चित्तवृत्तीलावालजरी ॥ होईलयानेंपापाची
मोहरी ॥ ध्यानकरितांदिवसरात्री ॥ होतीसंसारोभाग्यवंत ॥ ६ ॥ असोहेंगाइत्रीपुराणनि
श्चिती ॥ सकलसृष्टीगाईचीहीउत्पत्ती॥न्यासबीजमातृकाहोती ॥ गाइत्रीमातेपासोनी ॥ ७ ॥
वेदपुराणेंआदिशास्त्रें ॥ गायत्रीपासावहींसर्वत्रें ॥ सप्तपाताळेंएकवीसपरत्रें ॥ गायत्रीपासाव
उपजलीं ॥ ८ ॥ गाइत्रीकरितांयज्ञहोत ॥ यज्ञापासोनिमेघपडत ॥ मेघापासोनअष्टधान्यें
होत ॥ भूमीवरीनिर्माण ॥ ९ ॥ ऐसींअष्टधान्येंपिकती ॥ तेप्राणिमात्रसेविती ॥ अन्नापा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सोनिअनेकउत्पत्ती ॥ आंगींभरेबीजवीर्य ॥ १० ॥ तयावीर्यापासोन ॥ अनेकउत्पत्ती होतीनिर्माण ॥ प्राणिमात्रजन्मोन ॥ होतीलीनअनेककर्मीं ॥ ११ ॥ उत्पन्नव्हावयाकाय कारण ॥ मुख्यबीजपाहिजेजाण ॥ बीजकरितांभक्षण ॥ त्याचेंरेतउत्पन्नहोय ॥ १२ ॥ तें रेतस्त्रीगर्भींपडत ॥ पिंडजन्मतोअवचित ॥ ऐसीउत्पत्तीहोत ॥ गायत्रीपासोनी ॥ १३ ॥ असोहेंगायत्रीपुराण ॥ उत्पन्नजाहलेंकोठोन ॥ तेंऐकाश्रोतेसज्जन ॥ सांगतोंआतांसविस्तर ॥ १४ ॥ गायत्रीब्राह्मणाचीआदिमाता ॥ जीब्राह्मणाचीकुळदेवता ॥ जयापासोनीबीजमं त्रदेवता ॥ प्राप्तजाहलीं ॥ १५ ॥ तींहीमिळालींब्राह्मणासहज ॥ त्यापासोनथोरपणास हज ॥ वरीधोत्रेंतेजःपुंज ॥ मिरवितीजगांतब्राह्मण ॥ १६ ॥ त्याचामार्गसविस्तर ॥ सांगत सेशुकयोगींद्र ॥ गाइत्रीपुराणपवित्र ॥ आदिमध्यअवसानीं ॥ १७ ॥ गाइत्रीपुराणाचेंए काक्षर ॥ अश्वमेधाचेंफलसाचार ॥ जीवेदाचीमायपवित्र ॥ तिचेंमाहात्म्यकोणवर्णी ॥ १८ ॥ हेंगाइत्रीपुराण ॥ चारीवेदांचेंनिर्वाण ॥ अभाविकांवाटेआन ॥ परीहेंसुवर्णनेणवे ॥ १९ ॥ मूर्खासींकांसांगावाभेद ॥ तेचावटीकरितीलबुद्धिमंद ॥ परिहेंकेवळब्रह्मपद ॥ मृत्युलोकीं

जाणावें ॥ २० ॥ गाइत्रीपुराणापासोन ॥ ब्राह्मणजगांतजाहलेमान्य ॥ ऋषीपावलेऋषी पण ॥ तपअनुष्ठानकरोनी ॥ २१ ॥ वशिष्ठविश्वामित्रनारदादिक ॥ भृगुजमदग्नोपराशर देख ॥ हेमान्यतापावलेसकळिक ॥ गाइत्रीपासोनी ॥ २२ ॥ सकळब्राह्मणांकारणें ॥ येज्ञोपवीतमिळालेंजाण ॥ तेंगाइत्रीचेंपुराण ॥ सविस्तरसांगतसें ॥ २३ ॥ जेंअतिउत्तम त्रैलोक्याचेंनिधान ॥ तेंसांगेनअनुक्रमेंकरून ॥ ऐकाएकाग्रींकरूनीमन ॥ अवधाराहो ॥ ॥ २४ ॥ मुख्यहेंचिगाइत्रीपुराण ॥ अठराअध्यायांचेंअनुसंधान ॥ यांतूनीअक्षरकाढोन ॥ अनेकग्रंथकेले ॥ २५ ॥ इतिश्रीगाइत्रीपुराण ॥ विधीससांगेनारायण ॥ शुकसांगेपरीक्षि तीलागून ॥ प्रथमोऽध्यायगोडहा ॥ २६ ॥ १ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीशुकह्मणेपरीक्षितीसी ॥ गाइत्रीपुराणपर्येसीं ॥ जेंअद्भुतवर्तलेंसत्य लोकासी ॥ कैसीरीतीऐकातें ॥ १ ॥ शुकह्मणेपरीक्षिती ॥ जोनारायणआदिमूर्ती ॥ ज्याचीत्रैलोक्यींगाजेकीर्ती ॥ वैकुंठपतीह्मणतीजया ॥ २ ॥ जोविष्णुनारायण ॥ त्याचा पुत्रब्रह्मदेवआपण ॥ त्यासींजवळीबैसवून ॥ गाइत्रीपुराणसांगतसे ॥ ३ ॥ अठराअध्याय

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

समस्त ॥ ब्रह्मदेवासीविष्णुसांगत ॥ मगब्रह्मदेवासीज्ञानहोत ॥ चहूंवेदांचें ॥ ४ ॥ गाइत्री
पुराणश्रवणहोतां ॥ ब्रह्मयासीज्ञानजाहलेंतत्वतां ॥ चारीमुखींवेदवदतां ॥ अपरोक्षज्ञानपावलें
॥ ५ ॥ न्यासबोजमातृकापूर्ण ॥ येथेंपुराणवेदांचेंसमान ॥ चारोवेदांचेंहेंसदन ॥ नाहींअनु
मानसर्वथा ॥ ६ ॥ ॥ ऋग्वेदयजुर्वेदपाहीं ॥ सामवेदअथर्वणवेद ॥ चारीमुखींचारवेदप्रसिद्ध॥
गाइत्रीशास्त्रपुराण ॥ ७ ॥ अनेंकशास्त्रेंकटिबंधअसती ॥ तेथेंन्यासबीजाचीनाहींवस्ती ॥
येथेंमातृकान्यासविराजती ॥ ह्मणोनीत्रिजगतींधन्यहें ॥ ८ ॥ तेन्यासबीजगाइत्रीपासून ॥
त्याबीजाचेंऐकामहिमान ॥ कोणेंग्रथांतजाण ॥ बीजन्यासअसावें ॥ ९ ॥ मगतोग्रंथअमो
लवेदासमान ॥ सकलऋषीब्राह्मण ॥ सकळांमान्यपूर्ण ॥ अत्यादरेंपाहतां ॥ १० ॥ मगनार
दासींउपदेशित ॥ त्यासींत्रिकाळाचेंज्ञानहोत ॥ त्रैलोक्यांतगमनकरित ॥ जाहलाविख्या
तनारद ॥ ११ ॥ नारदआनंदेंबहुत ॥ व्यासालागींउपदेशीत ॥ व्यासशुकाशीसांगत ॥
न्यासबीजासहितपैं ॥ १२ ॥ गाइत्रीचीप्रौढीअगाध ॥ जैशींसमुद्राआंगींतीर्थेंप्रसिद्ध ॥ तैसे
याचेहेचारीवेद ॥ नाहींभेदअणुमात्र ॥ १३ ॥ तेंचिहेंगाइत्रीपुराण ॥ न्यासबीजासहित

संपूर्ण ॥ शुकसांगेपरीक्षितीलागून ॥ अठराअध्यायगुह्यजेंकां ॥ १४ ॥ येथोनीगाइत्रीपु
राण ॥ परिसावेंउत्तमजाण ॥ सकलगुह्यागुह्यपूर्ण ॥ तेंचिश्रवणकरावें ॥ १५ ॥ जेंनारायणें
जाण ॥ आधींसांगीतलेंब्रह्मदेवालागून ॥ ब्रह्मयानेंनारदासीकथिलेंपूर्ण ॥ नारदसांगेव्यासा
प्रती ॥ १६ ॥ सर्वकथाव्यासेंऐकोन ॥ शुकालागींसांगेआदरेंकरून ॥ शुकदयाळूहोऊन ॥
परीक्षितीसउपदेशी ॥ १७ ॥ नैमिषारण्यांत ॥ शौनकादिकांसूतसांगत ॥ ऐसेंहेंपरस्परें
ऐकत ॥ महागायत्रीपुराण ॥ १८ ॥ ॥ इतिश्रीगाइत्रीपुराण ॥ विधीससांगेनारायण ॥
शुकसांगेपरीक्षितीलागून ॥ द्वितीयोऽध्यायगोडहा ॥ १९ ॥ २ ॥ ॥ छ ॥
श्रीगणेशायनमः ॥ ॐनमोब्रह्मः १. ॐनमोशिवगाइत्रीः २. ॐनमोमहागाइत्रीः ३. ॐ
नमोकपिलागाइत्रीः ४. ॐनमोरुद्रगाइत्रीः ५. ॐनमोरामगाइत्रीः ६. ॐनमोहनुमानगा
इत्रीः ७. ॐनमोचंडिगाइत्रीः ८. ॐनमोआनंदीगाइत्रीः ९. ॐनमोमूळगाइत्रीः १०.
ॐनमोपीठस्वरूपेगाइत्रीः ११. ॐनमोशक्रगाइत्रीः १२. ॐनमोविश्वामित्रगाइत्रीः १३.
ॐनमोजीपत्रीः १४. ॐनमोजीदशश्वरेः १५. ॐनमोविधाबीजेः १६. ॐनमोशुद्धगा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इत्रीः १७. ॐनमोआदिबीजेः १८. ॐनमोविनायकेः १९. ॐनमोरक्ताक्षीः २०. ॐ
नमोकामाक्षीः २१. ॐनमोबीजाक्षीः २२. ॐनमोस्वयंप्रकाशीः २३. ॐनमोअनादिगा
इत्रीः २४. ॥ इतिचोवीसगाइत्रीजाण ॥ विष्णुसांगेब्रह्मदेवालागुन ॥ एकागाइत्रीचींबीजें
पूर्ण ॥ पांचपांचअसतीपैं ॥ १ ॥ तींबीजेंऐकआतां ॥ शुकसांगेपरीक्षितीसीतत्वतां ॥ तीपु
ढेंउत्तमअसेकथा ॥ सूतसांगेशौनकादिकां ॥ २ ॥ श्रीशुकउवाच ॥ पूर्णबीजें. क्रंक्रांक्रींक्रुं
क्रों; न्हंन्हांन्हींन्हुंन्हों; ल्लंल्लांल्लींल्लुंल्लों; त्रंत्रांत्रींत्रुंत्रों; ब्रंब्रांब्रींब्रुंब्रों; क्षंक्षांक्षींक्षुंक्षों; ल्हंल्हांल्हीं
ल्हुंल्हों; थंथांथींथुंथों; प्रंप्रांप्रींप्रुंप्रों; न्हंन्हांन्हींन्हुंन्हों; १०, रंरांरींरुंरों; द्रंद्रांद्रींद्रुंद्रों; ग्रंग्रांग्रीं
ग्रुंग्रों; श्लंश्लांश्लींश्लुंश्लों; शंशांशींशुंशों; ध्लंध्लांध्लींध्लुंध्लों; घ्रंघ्रांघ्रींघ्रुंघ्रों; ष्लंष्लां
ष्लींष्लुंष्लों; स्रंस्रांस्रींस्रुंस्रों; च्लंच्लांच्लींच्लुंच्लों; २०; भ्रंभ्रांभ्रींभ्रुंभ्रों; घ्रंघ्रांघ्रींघ्रुंघ्रों; ज्लं
ज्लांज्लींज्लुंज्लों; वंवांवींवुंवों; २४ हींचोवीसगाइत्रीचींबीजेंजाणावीं ॥ पांचाक्षरींपाहावीं ॥ ॥३॥
गाइत्रीसंगेंह्मणावीं ॥ अतीनेमेंकरोनीयां ॥ ३ ॥ पांचपांचअक्षरांचेंबोजएक ॥ चोवीसगाइ
त्रीसुरेख ॥ पृथकूबीजएकएक ॥ गाइत्रीलागींह्मणावें ॥ ४ ॥ तेंचिबीजाक्षरजाण ॥ सांगत

शुकमुखेंकरून ॥ पुढेंपरीक्षितीनेंऐकून ॥ राजानेंविनंतीकेली ॥ ५ ॥ महाराजन्यासमातृ
का ॥ पुढीलविस्तारसांगेंकां ॥ ऐसेंऐकोनीश्रीशुक ॥ प्रसन्नहोऊनसांगत ॥ ६ ॥
इतिश्रीगायत्रीपुराण ॥ विधीससांगेनारायण ॥ शुकसांगेपरीक्षितीलागून ॥ तृतीयोऽध्या
यगोडहा ॥ ७ ॥ ३ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥
श्रीगणेशायनमः ॥ शुकह्मणेगापरीक्षिती ॥ तुवांप्रश्नकेलामजप्रती ॥ न्यासआणिमातृका
निश्चितीं ॥ सांगाव्याह्मणोनियां ॥ १ ॥ तरीन्यासतेचोवीस ॥ तेएकचित्तेंपरीस ॥ तुमचें
पूर्वभाग्यविशेष ॥ ह्मणोनीहेंप्राप्तजाहलें ॥ २॥ अहोहेंगायत्रीपुराण ॥ विष्णुदेवाचेंगुह्यज्ञान ॥
तुझेंविचित्रप्राक्तन ॥ ह्मणोनिश्रवणजाहलेंतुज ॥ ३ ॥ आतांऐकन्यास॥श्रवणकरींसावकाश ॥
टाकोनियांमदमत्सरनिर्दोष ॥ श्रवणद्वारेंप्राशनकरीं ॥ ४ ॥ ॐक्रौँ ॐन्हौँ अंगुष्ठायनमः ॥
ॐक्रौँतर्जनीभ्यांनमः ॥ ॐन्हौँब्रौँअनामिकाभ्यानमः ॥ ॐन्हौँक्रौँमध्यमाभ्यांनमः ॥
ॐन्हांकनिष्ठिकाभ्यांनमः ॥ ॐसौँन्हौँनेत्रायनमः ॥ ॐक्रौँ शिखायैवषट् ॥ ॐत्रौँक्रौँपाँ
दत्रयायनमः ॥ ॐसौँद्रौँमुखायनमः ॥ ॐक्रौँहृदयायनमः ॥ ॐबाँक्रौँबाहुभ्यांनमः ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ॐन्हौंकंठायनमः ॥ ॐव्रौंब्रुं(?)यनमः ॥ ॐग्रौंजंघाभ्यांनमः ॥ ॐमुखायनमः ॥ ॐलौंपो
ष्टीयनमः ॥ ॐभ्रुकुट्यैनमः ॐन्ह्स्वायनमः ॥ ॐदीर्घायनमः ॥ ॐश्रींन्हींलॅलाटा
यनमः ॥ ॐलंक्रौंक्रौंन्होंपूर्णायनमः ॥ ॐप्रथमायनमः ॥ ॥ ऐसेहेचोवीसगाइत्रीचेन्यास ॥
गाइत्रीअसतीचोवीस ॥ पढावेसावकाश ॥ एकचित्तेंकरोनी ॥ ५ ॥ एकगाइत्रीकारणें ॥
न्यासएकबोलणें ॥ बीजएकपढणें ॥ मातृकात्यावरी ॥ ६ ॥ प्रथमबोलणेंगाइत्री ॥ बीज
त्यावरी ॥ न्यासह्मणावाउपरी ॥ मातृकाझडकरीह्मणाव्या ॥ ७ ॥ एकेगाइत्रीसचार ॥
ऐसेचोवीसमहामंत्र ॥ उपदेशीतजगदोद्धार ॥ ब्रह्मदेवासी ॥ ८ ॥ धन्यब्रम्ह्याचेंप्राक्तन ॥ उपदे
शीनारायण ॥ शुकह्मणेपरीक्षितीलागून ॥ तूंहीधन्यमृत्युलोकीं ॥ ९ ॥ जेंवेदांचेंजिव्हार ॥
ब्रह्मदेवाचेंमाहेर ॥ तेंगाइत्रीपुराणपरिकर ॥ प्राप्तजाहलेंतुजलागीं ॥ १० ॥ न्यासमातृका
बीजासहित ॥ चोवीसगाइत्रीप्रत्यक्ष॥असापरीक्षितीपुण्यवंत ॥ त्यासअमृतप्राप्तजाहलें॥ ११॥
मगह्मणेपरीक्षिती ॥ तूंसुखाचीसुखमूर्ती ॥ स्वामीआतांमजप्रती ॥ मातृकारीतीसां
गणें ॥ १२ ॥ शुकह्मणेपरीक्षितीकारणें ॥ आतांमातृकापरिसणें ॥ ब्रह्मदेवासनारायणें ॥

इत्थंभूतसांगीतलें ॥ १३ ॥ इतिश्रीगाइत्रीपुराण ॥ विधीससांगेनारायण ॥ शुकसांगेपरी
क्षितीलागोन ॥ चतुर्थोऽध्यायगोडहा ॥ १४ ॥ ४ ॥ ॥ छ ॥
श्रीगणेशायनमः ॥ शुकह्मणेपरीक्षिती ॥ तुवांश्रवणकेलेंनिगुती ॥ चोवीसगाइत्रीतुजप्रती ॥
न्यासबीजासहितसांगीतल्या ॥ १ ॥ आतांऐकेंमातृका ॥ त्याहीचोसदेखा ॥ श्रवणकरीं
भूमिपालका ॥ प्रारंभींमातृकाहेचीअसे ॥ २॥ ॐलंनमःॐसंनमःॐढंनमःॐरंनमःॐचंनमः
ॐशंनमःॐठंनमःॐघंनमःॐहंनमः ॐगंनमःॐचंनमः ॐछंनमः ॐक्षंनमःॐकंनमः ॐजं
नमःॐझंनमःॐउंनमः ॐथंनमः ॐठंनमःॐतंनमःॐज्ञंनमः ॐदंनमः ॐवंनमः ॐअंनमः
॥२४॥ऐशाचोवीसमातृका ॥ चोवीसगाइत्रीदेखा ॥ न्यासबीजब्रह्मादिकां अलभ्यहोय ॥ ३ ॥
हीविष्णुमुखींचीवाणी ॥ बोलिलेबीजन्यासस्वमुखेंकरोनी ॥ तेंब्रह्मदेवेंसांठविलेंकानीं ॥ अति
गुह्यजेंकां ॥ ४ ॥ हेंश्रुतहोतांचिनारदासी ॥ झडकरीधांवलाविधिचरणासो ॥ मगस्नेहेंनार
दासी ॥ हाउपदेशकेला ॥ ५ ॥ मगगाइत्रीचीऐकोनकीर्ती ॥ व्यासशरणआलानारदा
प्रती ॥ नारदेंबहुतनिगुती ॥ व्यासासीसांगीतलें ॥ ६ ॥ मगन्यासबीजमातृका ॥ व्यासेंसां

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गितलेंशुका ॥ आपुलापुत्रदेखा ॥ ह्मणोनीकृपाकेलीत्यावरी ॥ ७ ॥ मगशुकानेंप्रचोती
घेऊन ॥ त्यातोलगोष्टअनुसरून ॥ राजापरीक्षितीआलाशरण ॥ शुकस्वामीतें ॥ ८ ॥ मग
न्यासबाजमातृकासहित ॥ शुकपरीक्षितीसउपदेशित ॥ तेंचीगाइत्रीपुराणयथार्थ ॥ सूतसां
गेशौनकादिऋषींतें ॥ ९ ॥ नैमिषारण्यांत ॥ महातपस्वीऋषीबैसत ॥ त्यांप्रतीशुकसांगत ॥
शिष्यवैशंपायनाचा ॥ १० ॥ तोवैशंपायनव्यासशिष्यजाण ॥ त्यावैशंपायनालागुन ॥
गाइत्रीपुराणसांगतसे ॥ ११ ॥ जोपरीक्षितीचासुत ॥ जन्मेजयराजाविख्यात ॥ त्यानेंसत्र
करूनीत्वरित ॥ अवघेसर्पजाविले ॥ १२ ॥ हेंचिगाइत्रीपुराणाचेंबीजमातृकन्यास ॥ का
रणसर्पसत्रास ॥ हवनकरोनीसर्पांस ॥ भस्मकेलेंएकदांची ॥ १३ ॥ हेंचिन्यासबीजउच्चा
रून ॥ इंद्रासीखालींआणिलेंब्राह्मणें ॥ ऐसेंहेंगाइत्रीपुराण ॥ तारकमारकसर्वांसी ॥ १४ ॥
जेंवैशंपायनाचासुत॥नैमिषारण्यींऋषींससांगत॥ऋषीऐकतीसमस्त ॥ अतीआदरेंसी ॥ १५ ॥
इतिश्रीगाइत्रीपुराण ॥ विधीससांगेनारायण ॥ शुकसांगेपरीक्षितीलागुन ॥ पंचमो
ऽध्यायगोडहा ॥ १६ ॥ ५ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

श्रीरामचंद्रायनमः ॥ शुकसांगेपरीक्षितीलागुन ॥ ऐसेंहेंगाइत्रीपुराण ॥ त्याचेंबीजमातृका
न्यासपूर्ण ॥ सविस्तरसांगीतलें ॥ १ ॥ चोवीसगाइत्रीजाण ॥ बीजासहितउत्पन्न ॥ त्यानं
तरन्यासपूर्ण ॥ त्यानंतरमात्रका ॥ २ ॥ ऐसेब्रह्मदेवासी ॥ चोवीसगाइत्रीउपदेशी ॥ तेंचि
गाइत्रीपुराणपरियेसी ॥ उत्पन्नजाहलें ॥ ३ ॥ ब्रह्मदेवापासोन ॥ प्रगटलेंगाइत्रीपुराण ॥
सकलब्राह्मणाचेंधन ॥ गाइत्रीपुराणहें ॥ ४ ॥ परीक्षितीह्मणेशुकासी ॥ चोवीसगाइत्रीमज
सागसी ॥ परीआधींउत्पन्नकायमजसी ॥ सविस्तरसांगावें ॥५॥ आधीबीजन्यास ॥ गाइत्री
चौवीस ॥ कींमातृकाविशेष ॥ आधीकायतेंमजसांग ॥ ६ ॥ ऐसाशुकयोगींद्राप्रती ॥ प्रश्नके
लानिगुती ॥ मगशुकसांगती ॥ परीक्षितीकारणें ॥ ७ ॥ शुकह्मणेपरीक्षिती ॥ प्रथमबीजें
चोवीसहोती ॥ त्यानंतरचोवीसगाइत्री ॥ न्यासउत्पत्तीमगहोय ॥ ८ ॥ न्यासापासूनीमा
तृका ॥ चोवीसअसतीदेखा ॥ एकेगाइत्रीचेंएकबीजएकमातृका ॥ एकन्यासजाणिजे ॥
॥ ९ ॥ प्रथमगाइत्रीह्मणती ॥ वृत्तेंबीजेंन्यासअसती ॥ तेयथान्यायजपती ॥ सकलब्राह्मण
॥ १० ॥ पांचवीगाइत्रीजरीजपावी ॥ तरीन्यासमात्रकापाचवेवह्मणावी ॥ अशीमंत्रा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चीठेवी ॥ सांगीतलीतुज ॥ ११ ॥ दहावीगाइत्रीजरीह्मणणें ॥ तरीन्यासमातृकाबीजबोलणें॥
ऐसेंमंत्राचेंसाधन ॥ तुजलागींसांगीतलें ॥ १२ ॥ पंध्रावीगाइत्रीह्मणतांजाण ॥ तेचन्यास
मातृकापूर्ण ॥ ध्यानकरोनीसमान ॥ अनुक्रमेंसांगतोंतुज ॥१३॥ विसावीअथवाचोविसावी ॥
आपणासींपाहिजेतीह्मणावी ॥ बीजमातृकाओळखूनबरवी ॥ द्यावीज्याचीत्यास ॥ १४ ॥
ऐसेंहेंसाधन ॥ जपावेंयथैवपुण्येंकरून ॥ ज्याचात्यासमंत्रदेऊन॥ बरवीखूणओळखाही ॥ १५ ॥
यांतूनपांचवीजेमिळाली ॥ तेव्हांगीतानामपावली ॥ दहावीजयांतूनघेतली ॥ तेव्हांभाग
वतनामपावलें ॥ १६ ॥ चारीबीजेंमिळतांजाण ॥ ज्ञानेश्वरीचाचढलामान ॥ सहाबीजें
घेतलींयांतून ॥ गुरुचरित्रनामपावलें ॥ १७ ॥ ऐसेसकलग्रंथ ॥ बीजन्यासमातृकामिळत ॥
तेणेंकरूनीग्रंथनामांकित ॥ थोरपणातेंपावले ॥ १८ ॥ ब्राह्मणाचाचढलामान ॥ चोवीस
गाइत्रीपासून ॥ साहीशास्त्रेंअठरापुराणें ॥ थोरपणातेंइणेंआणिलीं ॥ १९ ॥ चारीवेदांचें
बीज ॥ चोवीसगाइत्रीसमज ॥ कोणत्याहीग्रंथांतपडतांबीज ॥ तरीमहामंत्रत्यासींह्मणती ॥
॥ २० ॥ न्यासबीजावांचून ॥ मंत्रखोटाजाण ॥ न्यासबीजमातृकाअसतीपूर्ण ॥ शुद्धतो

ग्रंथठसावा ॥ २१ ॥ कोणताहीग्रंथजाहला ॥ न्यासबीजअसतीत्याला ॥ मंत्रतोमान्यतेसी
पावला ॥ सत्यहोयमंत्रतो ॥ २२ ॥ उत्तमजरीमंत्रआहे ॥ न्यासबीजमातृकानोहे ॥ तोमंत्र
असोनीकाय ॥ सुफलनसेसर्वथा ॥ २३ ॥ ऐसेंमंत्राचेंमाहात्म्य ॥ तुजसांगितलेंउत्तम ॥ त
रीहेचोवीसगाइत्रीउत्तम ॥ न्यासबीजासहितसांगितल्या ॥ २४ ॥ मुळींजाहलेपांचवर्ण ॥
त्यांसीदीधल्यागाइत्रीवांटोन ॥ ब्राह्मणालागींजाण ॥ न्यासबीजासहितसांगितल्या ॥२५॥क्ष
त्रियासीपांच ॥ वैश्यासीपांच ॥ शूद्रासीपांच ॥ अतिशूद्रासीचार ॥ एकूणचोवीसगाइत्रीं
चाविभागकेला ॥ २६ ॥ ऐशाचोवीसगाइत्रीजाण ॥ न्यासबीजासहितवर्तमान ॥ तीनही
वर्णसंहारून ॥ गाईठकवूनआणिल्या ॥ २७ ॥ ऐसाप्रकारकरून ॥ ब्राह्मणेंकेलेंरक्षण ॥
क्षत्रियवैश्यशूद्रअतिशूद्रालागून ॥ चौघांठकवूननेल्यापैं ॥ २८ ॥ कलियुगामाजीजाण ॥
भुलथापदेउनीब्राह्मण ॥ खोटेमंत्रसांगोन ॥ चारवर्णासीरिझविती ॥ २९ ॥ ऐसाहाप्रकार ॥
परीक्षितीससांगेव्यासपुत्र ॥ ऐकरायासविस्तर ॥ पुढेंअनेकसांगतों ॥ ३० ॥ इतिश्रीगाइ
त्रीपुराण ॥ विधीससांगेनारायण ॥ शुकसांगेपरीक्षितीलागून ॥ षष्ठोऽध्यायगोडहा ॥ ३१ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीगणेशायनमः ॥ परीक्षितीपुसेशुकालागून ॥ स्वामीसांगितलेपांचवर्ण ॥ यांसीचोवीसगा
इत्रीविभागून ॥ विधीनेंदोधल्या ॥ १ ॥ त्यागाइत्रीब्राह्मण ॥ ठकवूनीचारीवर्ण ॥ चोवीसघे
तल्याआपण ॥ कोणेरीतींसांगिजे ॥ २ ॥ ऐशींपरीक्षितोचींवचनें ॥ ऐकोनीशुकस्वामीनें ॥
बोलताजाहलासंपूर्ण ॥ कृतयुगापासोनियां ॥ ३ ॥ शुकह्मणेगापरीक्षितीराया ॥ चित्तदेईं
शब्दालागिंसखया ॥ तुजसांगतोंविस्तारूनियां ॥ गाइत्रीपुराणहें ॥ ४ ॥ कृतयुगींब्रह्मदेवा
नें ॥ नेमिलेपांचवर्ण ॥ तेपर्येसींकोणकोण ॥ सांगतोंतुजलागीं ॥ ५ ॥ ब्राह्मणजाहलेमुखा
पासून ॥ त्यांसीपांचगाइत्रीदिल्याविष्णूनें ॥ क्षत्रियनिर्माणबाहूपासून ॥ त्यांसीदिधल्यापां
च ॥ ६ ॥ वैश्यजाहलेह्रुदयापासून ॥ त्यांसीपांचगाइत्रीदेऊन ॥ शूद्रजाहलेजंघेपासून ॥
त्यांसीदीधल्यापांच ॥ ७ ॥ पाउलापासोनीअतिशूद्रनिर्माण ॥ त्यांसीदीधल्याचारपूर्ण॥अना
श्रितजनजाणोनियां ॥ ८ ॥ ऐसेपांचवर्णासीआपण ॥ चोवीसगाइत्रीदेऊन ॥ मगत्रेतायु
गींपरशुरामानें ॥ क्षत्रियसंपूर्णमारिले ॥ ९ ॥ क्षत्रियांच्यागाई ॥ ब्राह्मणासीदिधल्यापाहीं ॥
द्वापारींवैश्यांच्यागाईपाहीं ॥ उरल्याअसतीतेथें ॥ १० ॥ तोबदरिकाश्रमींजाऊन ॥ घोरत

॥७॥

पकरीतजाण ॥ त्याच्यापांचगाइत्रीआपण ॥ घेतल्याजाणब्राह्मणानें ॥११॥ कलियुगींशूद्रबु
द्धिहीन ॥ त्यांसीनकळेजाण ॥ मगब्राह्मणानेंकपटेंकरून ॥ घेतल्याठकवूनत्याच्याही॥१२॥
मगअतीशूद्राच्याचार ॥ राहिल्याहोत्यासाचार ॥ ब्राह्मणानेंकरोनीविचार ॥ त्याहीघेतल्या
साक्षेपें ॥ १३ ॥ त्यासीसांगतीब्राह्मण ॥ हेमंत्रकासयातुजलागून ॥ तुह्मीसाक्षातगाइत्रीआ
णून ॥ उदरांतरक्षणकराव्या ॥ १४ ॥ ब्राह्मणसांगतीमात ॥ अतिशूद्रहर्षभरित ॥ ह्मणती
न्यासबीजमातृकांसहित ॥ गोरक्षणउदरींकरावें ॥ १५ ॥ ऐसीकपटयुक्तीकरून ॥ न्यासबी
जमातृकापूर्ण ॥ होऊनीमैंदब्राह्मण ॥ घेतल्याहिरोनसर्वस्वें ॥ १६ ॥ मगन्यासबीजमातृका॥
अतिशूद्रमागतीदेखा ॥ ब्राह्मणह्मणतीऐका ॥ नाहींतगाइत्रीआह्मांपासीं ॥ १७ ॥ आह्मी
त्याचवेळींतिन्हीमंत्र ॥ गाइत्रीपासींदिधलेसमग्र ॥ तुह्मीआपलासुमार ॥ पहाउदरींअसती
कीं ॥ १८ ॥ ऐसेंत्यासीसमजाऊन ॥ पुन्हात्यावरआरोपठेवून ॥ चारगाइत्रोबीजांसहितसं
पूर्ण ॥ ब्राह्मणेंहिरोनीघेतल्या ॥ १९ ॥ ऐसेंगाइत्रीचेंआख्यान ॥ शुकसांगेपरीक्षितीलागून ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ह्मणेसमस्तहरिल्याब्राह्मणें ॥ चौघांजणांसीठकवून ॥ २० ॥ इतिश्रीगाइत्रीपुराण ॥ वि
धीससांगेनारायण ॥ शुकसांगेपरीक्षितीलागून ॥ सप्तमोऽध्यायगोडहा ॥ २१ ॥ ॥ छ ॥
श्रीगणेशायनमः ॥ पराक्षितीपुसेशुकयोगींद्राप्रती ॥ अतीशूद्राच्याचारगाइत्रीघेती॥ठकवूनि
यांब्राह्मणजाती ॥ कोणेरीतींमजसांगा ॥ १ ॥ अतीशूद्रेंभक्षिल्यागाई ॥ मागुतीकेवियेती
योगिराया ॥ हीगोष्टमोठीवरिष्ठहोय ॥ सांगावीसोयमजलागीं ॥ २ ॥ ब्राह्मणचारवर्णांतश्रे
ष्ठ ॥ केवींहोतीक्रियाभ्रष्ट ॥ कींअतिशूद्राचेंफोडूनपोट ॥ मागुतीआणिल्यात्यानीं ॥ ३ ॥
अठरावर्णांतश्रेष्ठब्राह्मण ॥ त्यांनींउच्छिष्टपात्रेंहिरोन ॥ बीजन्यासमातृकापूर्ण ॥ कैसेनहोती
महाराज ॥ ४ ॥ अतीशूद्राचेमंत्र ॥ कैसेबोलतीविप्र ॥ तेतरउच्छिष्टजाहलेसमग्र ॥ नाहीं
पारअधर्मा ॥ ५ ॥ रत्नखचितसुवर्णसुरी ॥ घेऊनीजसीमारावीउरीं ॥ दोषगुणआपुलेशिरीं ॥
करोनीचोरीघेतले ॥ ६ ॥ ऐकूनपरीक्षितीचेंवचन ॥ शुकस्वामीसकरितीप्रश्न ॥ बोलते
जाहलेसंपूर्णज्ञान ॥ कृतयुगापासोनिया ॥ ७ ॥ शुकह्मणेपरीक्षितीराया ॥ चित्तदेईशब्दा
सीसखया ॥ कलियुगींब्राह्मण ॥ क्रियाभ्रष्टहोतील पैं ॥ ८ ॥ शुकह्मणेपरीक्षिती ॥ चारगाइ

त्रीत्याशूद्राप्रती ॥ विधीनेंदिधल्यानिश्चिती ॥ तेअतिशूद्रसांभाळिती ॥ ९ ॥ मंत्रबाह्मणां
सीअसाध्यजाहले ॥ मगअतिशूद्रांसीबोलाविलें ॥ ह्मणतीगाइत्रीनेंतुह्मांसीकायदिधलें ॥ह्मण
तीचमत्कारदावातो ॥ १० ॥ अतिशूद्रसांगतीविप्रांसी ॥ चारगाइत्रीआम्हांपासीं ॥ तेणेंचा
रेवदांचेंज्ञानआह्मांसी ॥ ऋषिवर्यायेतअसे ॥ ११ ॥ ब्राह्मणह्मणतीदावींह्मणोन ॥ अतिशूद्र
बोलतीनिर्वाणज्ञान ॥ ह्मणोनदावितीब्राह्मणालागून ॥ तेव्हांब्राह्मणविस्मितजाहले ॥ १२ ॥
ब्राह्मणह्मणतीअतिशूद्रांस ॥ मातृकाबीजन्यास ॥ बाहेरठेऊनीसावकाश ॥ होईलविशेषज्ञा
नतुह्मां ॥ १३ ॥ न्यासबीजठेवितांबाहेरी ॥ उदरींसांठवितांगाइत्री ॥ मगज्ञानाचीथोरी ॥
होईलभारीपाहून ॥१४॥ अतीशूद्रेंऐसेंऐकून ॥ चारीगाइत्रीमुख्यटाकून ॥ न्यासबीजमातृका
पूर्ण ॥ ब्राह्मणाहातींठेविल्या ॥ १५ ॥ गाइत्रीउतरतांउदरांत ॥ जेथेंबीजेंहोतींराहात ॥ ते
हीयेउनीमुनीमुष्टींत ॥ ब्राह्मणाच्याराहिल्या ॥१६॥ आपुलींबोजेंहुडकीत ॥ गुप्तरूपेंपातल्या
मुष्टींत ॥ ब्राह्मणेंमुष्टीआकर्षोनीत्वरित ॥ केल्यागुप्ततेथेंची ॥ १७ ॥ जेथेंबीजतेथेंगाई ॥
न्यासमातृकात्याचठायीं ॥ गुप्तराहिल्यासर्वही ॥ ह्मणतीनाहींब्राह्मण ॥ १८ ॥ अतिशूद्रांसी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ठकऊनी ॥ आपुल्याहातींन्यासबीजघेऊनी ॥ त्यांसालबाडीसागोनी ॥ त्यांकडीलगाईहि
राविल्या ॥ १९ ॥ अतिशूद्राच्याउदरांतून ॥ वायुरूपेंगाइत्रीयेऊन ॥ जेथेंन्यासबीजमातृका
जाण ॥ राहिल्यायेऊनीतेथेंची ॥ २० ॥ ब्राह्मणांजाहलेंसमाधान ॥ चोवीसगाइत्रीमिळाल्या
जाऊन ॥ मोठ्याआनंदानेंमंत्रहवन ॥ मगकरितेजाहले ॥ २१ ॥ शुकह्मणेपरीक्षिती ॥ ऐ
सीगाइत्रीपुराणाचीउत्पत्ती ॥ सांगितलीतुजप्रती ॥ जेंकांमूळबीजहें ॥ २२ ॥ इतिश्रीगाइ
त्रीपुराण ॥ विधीससांगेनारायण ॥ शुकपरीक्षितीलागून ॥ अष्टमोऽध्यायगोडहा ॥२३॥८॥
श्रीगणेशायनमः ॥ परीक्षितीह्मणेस्वामीशुका ॥ तूंकृपेचीमूर्तीदेखा ॥ बीजन्यासमातृका ॥
कैसेजाहलेउत्पन्न ॥ १ ॥ तेआलियाकोठोन ॥ त्यांचेंमुख्यकोणतेंठिकाण ॥ हेंसांगामुळा
पासून ॥ मजलागींप्रगटकरीं ॥ २ ॥ ऐसापरीक्षितीचाप्रश्न ॥ शुकयोगींद्रेंऐकोन ॥ प्रत्युत्तर
देतपूर्ण ॥ होतकर्णतृप्तपैं ॥ ३ ॥ शुकह्मणतीपरीक्षिती ॥ चित्तठेवीश्रवणार्थी ॥ जेंसांगीतलें
विधीप्रती ॥ श्रीविष्णुनारायणें ॥ ४ ॥ तेंचीतुजसांगेन ॥ परीसावधहोऊनीकरींश्रवण ॥
महागुह्यहेंनिर्वाण ॥ मनस्थिरकरीयेथें ॥ ५ ॥ गाइत्रीएकवीसस्वर्गाचेशिखरीं ॥ रत्नपूर

नामेंनगरी ॥ सोंबीजाक्षरी ॥ निराकारीवसतसे ॥ ६ ॥ चारीपायप्रथमनिर्मून ॥ मगअनंत
झालीरचना ॥ पांचशिरेंतिजलागून ॥ पुढेंशिरेंबहुतजाहलीं ॥ ७ ॥ तीनपुच्छेंसाहाशिंगें
पूर्ण ॥ वर्णीतवेदआपण ॥ त्याचासंपूर्णअर्थजाण ॥ सांगेनतुह्मांस्पष्टोक्तें ॥ ८ ॥ चारपायते
चारवेद ॥ पांचशिरेंतींपंचतत्वेंप्रसिद्ध ॥ तीनपुच्छेंतेब्रह्माविष्णुमहेश्वरशुद्ध ॥ त्रिगुणआत्मा
तेचिसर्वदेव ॥ ९ ॥ सहाशिंगेंतींसहापुराणें ॥ तीनशिखरेंउंचपूर्ण ॥ ऐसेंगाइत्रीचेंअनुमान ॥
जाणिजेनिजअंतरीं ॥ १० ॥ तेगाइत्रीशुद्धब्रह्मविष्णुमाताजाण ॥ न्यासबीजमातृकातिजपा
सून ॥ जाहलींअसतीनिर्माण ॥ सत्यवचनपैंजाण ॥ ११ ॥ तीगाइत्रीवैकुंठींयेऊन ॥ विष्णू
सींकरीभाषण ॥ चोवीसशब्दबोलललीह्मणोन ॥ जाहालींबीजेंनिर्माणहीं ॥ १२ ॥ तेथोनी
तेसत्यलोकीं ॥ गेलेब्रह्मदेवापार्शी ॥ शब्दचोवीसबोलिलेत्यासी ॥ तेचीह्माचोवीसमातृका
॥ १३ ॥ मगतीआलीकैलासीं ॥ चोवीशशब्दशंकरासी ॥ बोललीन्यासह्मणतीत्यासी ॥
तेचीहेन्यासजाणिजे ॥ १४ ॥ बीजत्याविष्णूचें ॥ न्यासत्याशंकराचे ॥ मातृकागणीतब्रह्म
याच्या ॥ एवढाप्रकारगाइत्रीचाअसे ॥ १५ ॥ विष्णुतेंगाइत्रीचेंमुख ॥ शंकरतेंपुच्छदेख ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ब्रह्मानेत्रसुरेख ॥ तीनहीदेवगाइत्रीपासोनी ॥ १६ ॥ बीजापासूनगाइत्रीनिर्माण ॥ गाइत्री
पासूनन्यासपूर्ण ॥ न्यासापासोनीमातृकापूर्ण ॥ आकारजाहलागाइत्रीचा ॥ १७ ॥ ऐसा
हामुळींचाआकार ॥ तुजसांगितलासविस्तर ॥ पुढेंआणिकभिन्नभिन्नप्रकार ॥ तोहीसांग
तोंऐकराया ॥ १८ ॥ इतिश्रीगाइत्रीपुराण ॥ विधीससांगेनारायण ॥ शुकसांगेपरीक्षिती
लागून ॥ नवमोऽध्याय गोडहा ॥ १९ ॥ ९ ॥ ॥ छ ॥
श्रीगणेशायनमः ॥ शुकह्मणेरायासमर्था ॥ गाइत्रीचेभागतत्त्वतां ॥ श्रवणकरावेभूमिनाथा ॥
अवयवचोवीसपैं ॥ १ ॥ तेचीगाइत्रीचोवीसनिर्माणपूर्ण ॥ एकएकगाइत्रीचेंवर्णन ॥ गाइत्री
सकळजाणिजेपूर्ण ॥ निर्मिल्यापैं ॥ २ ॥ चोवीसतत्वांपासून ॥ चोवीसगाइत्रीनिर्माण ॥ त्या
दिधल्यावांटून ॥ पांचाहीवर्णांसी ॥ ३ ॥ ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्र ॥ पांचवेजेकांअतिशूद्र॥पां
चांसीदीधल्यासमग्र॥न्यासमातृकाबीजमंत्र ॥ पांचांजणासीदीधलें ॥ ४ ॥ बीजत्यागाइत्री
जाण ॥ दोहींतभेदनाहींपूर्ण ॥ बीजआणिगाइत्रीजाण ॥ एकरूपदोघांचें ॥ ५ ॥ न्यासतेंपुच्छ
जाणिजे ॥ मातृकाचरणबोलिजे ॥ बोजतेंअवश्यओळखिजे ॥ पूर्णगाइत्रीचें ॥ ६ ॥ परीक्षि

तीह्मणेशुकासी ॥ चोवीसवांटल्यापांचवर्णांसी ॥त्यांचाविभागमजसी ॥ विस्तारूनीसांगावें ॥
॥७॥शुकह्मणेपरीक्षितीनाथा ॥ सविस्तरऐकआतां ॥ भेदसांगतोंतत्वतां ॥ उघडोनियां ॥८॥
पांचदिधल्याब्राह्मणांसी ॥ त्यांचाविभागपर्येसीं ॥ एकसंध्यादुरसीहोमहवनविधीसी ॥ तिस
रीमौंजीबंधन ॥ ९ ॥ चौथीवेदाध्ययन ॥ पांचवीसन्याग्रहण ॥ हींपांचबीजेंजाण ॥ ब्राह्म
णांसीदीधलीं ॥ १० ॥ क्षत्रियांसीदिधल्यापाच ॥ त्यांचेविभागपर्येस ॥ एकयज्ञोपवीतदुसरें
दानविशेष ॥ ब्राह्मणांसीद्यावीं ॥ ११ ॥ तिसरेंपुराण ॥ चौथेंतेजबळशौर्यजाण ॥ पांचवेंवे
दपूजन ॥ हींपांचबीजेंक्षत्रियांसी ॥ १२ ॥ आतांवैश्यांचींबीजें ॥ एकमौंजीबंधनकीजे ॥
दुसरेंयज्ञोपवीतपूजे ॥ तिसरेंधर्मरक्षावे ॥ १३ ॥ चौथेंपितृदैवत ॥ पांचवेंस्नानसोहळेंहोत ॥
एसेंहेंवैश्याचेंमत ॥ सांगितलें ॥ १४ ॥ शूद्राचींबीजेंपांच ॥ त्यांचाविभागपर्येस ॥ एकदेव
पूजन ॥ दुसरेंधर्मदानविशेष ॥ तिसरेंगाइत्रीपालन ॥ १५ ॥ चौथेंयज्ञोपवीत ॥ पांचवेंभूमि
सेवननिश्चित ॥ बीजपेरावेंभूमींत ॥ आणिदशगुणीकरावें ॥ १६ ॥ अतिशूद्राचींबीजेंचार ॥
तींसागतोंसविस्तर ॥ एकयज्ञोपवीतसाचार ॥ दुसरेंप्रेतदहन ॥ १७ ॥ तिसरेंदवासमोरअ

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सणें ॥ चौथेंदेवासमोरवाद्यवाजविणें ॥ हींचारबीजेंअतिशूद्राकारणें ॥ मूळींचअसती ॥ १८ ॥
ऐसेचोवीसविभागजाण ॥ तुजसांगितलेनिवडोन ॥ याप्रमाणेंपांचवर्णानें ॥ आपआपल्या
स्वधर्मानेंवर्तावें ॥ १९ ॥ ऐसापांचवर्णांचाविचार ॥ तुजसांगितलासाचार ॥ जोविष्णूनें
आपलापुत्र ॥ ब्रह्मयासीउपदेशिला ॥ २० ॥ तेंचिहेंगाइत्रीपुराण ॥ सागितलेंतुजलागुन ॥
न्यासबीजतेंचिपूर्ण ॥ दुसराविचारयेथेंनसे ॥ २१ ॥ इतिश्रीगाइत्रीपुराण॥विधीससांगेनारा
यण ॥ शुकसागेपरीक्षितीलागुन ॥ दशमोऽध्यायगोडहा ॥ २२ ॥ १० ॥ ॥ छ ॥
श्रीगणेशायनः ॥ परीक्षितीह्मणेस्वामीशुका ॥ माझीफेडावीआतांशंका ॥ पांचवर्णालागीं
देखा ॥ यज्ञोपवीतेंकोणकोणतींदिधलीं ॥ १ ॥ कोणेंकितीपेडाचींघालावीं ॥ गांठकोणती
द्यावी ॥ कोणालागींकैसींसांगावीं ॥ कृपाकरोनीदयाळा ॥ २ ॥ शुकह्मणेपरीक्षिती
नाथा ॥ कितीपिंडऐकआतां ॥ ब्राह्मणासीतीनपिंडतत्वतां ॥ परीसत्तावीससुतेंअसावीं
॥ ३ ॥ एकएकापिंडाकारणें ॥ नउनउसुतेंअसणें ॥ ऐसेएकपिंडाचेभागतीनकरणें ॥ ब्रह्म
गांठमारावी ॥ ४ ॥ डाव्याखांद्यावरीअसावें ॥ उजव्याकाखेंतीलपडावें ॥ ऐसेंब्राह्मणाचें

जाणावें ॥ परीक्षितीराया ॥ ५ ॥ क्षत्रियाचेपिंडपांच ॥ एकएकपिंडासीसुतेंपांच ॥ ऐसीं
सुतेंपंचवीस ॥ एकंदरपांचपिंडांसी ॥ ६ ॥ रुद्रगांठीदेऊन ॥ उजव्याखांद्यावरून ॥ डाव्या
हाताखालींपडोन ॥ यज्ञोपवीतघालावें ॥ ७ ॥ वैश्याचेपिंडचार ॥ एकएकपिंडासींसुतेंपां
चसाचार ॥ पाचसुतासीदोराथोर ॥ त्याचेचारभागकरावे ॥ ८ ॥ चौपिंडींकरून ॥ वीससु
तांचेंवैश्यानेंघालून ॥ इंद्रगांठदेऊन ॥ डाव्याखांद्यावरीअसावें ॥ ९ ॥ उजव्याकाखेतळीं
पडावें ॥ ऐसेंवैश्याचेंजाणावें ॥ आतांशूद्राचेंपरिसावें ॥ अठरासुतेंतयासी ॥ १० ॥ डाव्या
खांद्यावरीठेवून ॥ उजव्याकाखेंतून ॥ हेंशूद्राचेंलक्षण ॥ यज्ञोपवीताचेंपैं ॥ ११ ॥ साहासु
तांचापिंडएक ॥ दोराराखावाएक ॥ तीनपिंडएकसाम्यक ॥ विष्णुगांठीदेइजे ॥ १२ ॥
अतिशूद्राचेंयज्ञोपवीत ॥ त्यासीपिंडअसावेसात ॥ तीनसुतांचादोराएकनिश्चित ॥ वळो
नियाकरावा ॥ १३ ॥ त्याचेसातभागकरून ॥ सातपिंडकरावेजाण ॥ एकवीससुतेंअवघीं
मिळोन ॥ परीसातपिंडतयाचे ॥ १४ ॥ शिवगांठीदेऊन ॥ उजव्याखांद्यावरून ॥ डावे
काखेतळींजाण ॥ गळांअतिशूद्रानेंघालावें ॥ १५ ॥ ऐशींपांचवर्णांकारणें ॥ शास्त्रेंनिवडि

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

लींयज्ञोपवीतंजाण ॥ आपल्यास्वधर्माप्रमाणें ॥ पांचहीवर्णघालिती ॥ १६ ॥ दोराबोलतां सुत ॥ नतुटावाक्कचित ॥ एकचीदोरायथार्थ ॥ मगत्याचेपिंडबांधावे ॥ १७ ॥ मांडीसींवेष्टनघालोन ॥ पिंडसारखेकरून ॥ मगगाठीदेऊन ॥ यज्ञोपवीतगळांघालिजे ॥ १८ ॥ पिंडतुटलाजरीकिंचित ॥ अथवासुटेलजरीसुत ॥ तरीतेंनघालावेंयज्ञोपवीत ॥ तेंटाकोनीनवेंकरावें ॥ १९ ॥ ब्राह्मणाचेंयज्ञोपवीत ॥ तीनपिंडसत्ताविससुत ॥ एकपिंडासींनवसुत ॥ ब्रह्मगाठीमारावी ॥ २० ॥ क्षत्रियासीपिंडपांच ॥ पांचपिंडासीसुतेंपंचवीस ॥ रुद्रगांठीतयास ॥ एकापिंडासीपांचसुतेंजाणावीं ॥ २१ ॥ वैश्याचेपिंडचार ॥ वीससुतेंसाचार ॥ पांचसुतांचापिंडनिर्धार ॥ इंद्रगांठीतयासी ॥ २२ ॥ अतिशूद्राचेपिंडसात ॥ एकवीससुतें समस्त ॥ तीनसुतांचापिंडएकहोत ॥ शिवगांठीतयाची ॥ २३ ॥ ऐसापांचवर्णांसी ॥ अधिकारअसेयज्ञोपवीतासी ॥ हाअक्रावाअध्यायनिश्चयेसी ॥ केवळगाइत्रीजाणावी ॥ २४ ॥ हाचिअध्यायसेवेचा ॥ हाचिअध्यायचारीवेदांचा ॥ हाचिअध्यायहोमाचा ॥ कर्माधर्माचाहाचिअध्याय ॥ २५ ॥ हाअकरावाअध्यायह्मणोन ॥ यज्ञोपवीतगळांघालावेंजाण ॥ हाचि

॥१२॥

गाइत्रीमंत्रपूर्ण ॥ प्रत्यक्षगाइत्रीयांतअसे ॥ २६ ॥ इतिश्रीगाइत्रीपुराण ॥ विधीससांगेनारायण ॥ शुकसांगेपरीक्षितीलागोन ॥ एकादशोऽध्यायगोडहा ॥ २७ ॥ ११ ॥ छ ॥ ॥ श्रीगणेशायनमः ॥ परीक्षितीह्मणेशुकयोगींद्रालागून ॥ स्वामीमुळींचेपुरुषकोण ॥ पांचजणांचेंराहाणेंठिकाण ॥ इतकेंसांगामजप्रती ॥ १ ॥ शुकह्मणेऐकपरीक्षिती ॥ महादेवनामेंपुरुष होती ॥ ब्राह्मणाचामूळपुरुषतत्वती ॥ विधीपासोनजन्मत्याचा ॥ २ ॥ कश्यपदेशत्याचा ॥ मिथुळनामेंदेशविप्रांचा ॥ ऐकआतांक्षत्रियांचा ॥ मूळपुरुषकोणतो ॥ ३ ॥ ब्रह्मदेवाच्यामुखापासोन ॥ प्रथमक्षत्रियस्वयेंभवन ॥ वसिष्ठऋषीजाण ॥ रुद्रदेवमुळींचा ॥ ४ ॥ हिंदुस्थानअंतरवेददेश ॥ हाजाणक्षत्रियांस ॥ वैश्यांचामूळपुरुष ॥ सांगतोंऐकआतां ॥ ५ ॥ ब्रह्मदेवाच्याजानूपासोन ॥ मूळपुरुषवैश्यधनपतीजाण ॥ बृहस्पतीऋषीइंद्रदेवपूर्ण ॥ कर्नाटकदेशवैश्यांचा ॥ ६ ॥ ब्रह्मदेवाच्याढोंपरापासून ॥ मूळपुरुषशूद्रनागानाम ॥ शुक्राचार्यऋषीविष्णुदैवतपूर्ण ॥ आचार्यव्रतगुजराथदेश ॥ ७ ॥ ब्रह्मदेवाच्यातळव्यापासोन ॥ अतिशूद्रांचीउत्पत्तीजाण ॥ कलियुगींएकाकारपूर्ण ॥ त्यायातोपासोनहोईल ॥ ८ ॥ असोगाइत्रीचेअठराभ।

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गकेले ॥ तेआतांपाहिजेऐकिले ॥ चित्तदेऊनीवहिले ॥ ऐकेंपरीक्षितीभूपाळा ॥ ९ ॥ ब्रम्ह्या
नेंघेतलेखुबेचारी ॥ तेश्रावणमासींनिर्धारीं ॥ पोठाचेबोंबकरितीचारी ॥ प्रतिदिवशींहोमापा
शींभक्षिती ॥ १० ॥ क्षत्रियांनींपळवूनआपण ॥ कंठाचीझालरीनेलीत्यानें ॥ मुखनेलेंकु
णब्यानें ॥ वैश्यानेंनेलेचरणचारी ॥ ११ ॥ अतिशूद्रानेंमांससकळ ॥ श्रेष्ठभागनेलासबळ ॥
न्हाव्याहातींसबळ ॥ शिंगोट्यादोन्हीमिळाल्या ॥ १२॥ रजकेंघेतलाकोथळा ॥ त्याचाधुतां
चजन्मगेला ॥ चर्ममिळालेंचर्मकाला ॥ त्याचाजन्मत्यांतची ॥ १३ ॥ सोनारेंघेतलीतंगडी ॥
शिंप्यानेंघेतलीशेंपटी ॥ कासारानेंघेतलीबरगडी ॥ लोहारानेंनाडीशिरानेल्या ॥ १४ ॥
तेल्यानेंघेतलापाठीचाकणा ॥ कुंभारेंआटोपलेदोन्हीकान ॥ जिव्हानेलीसाळ्यानें ॥ ऐसी
गाइत्रीविभागिली ॥ १५ ॥ कोष्टियासीसांपडलेकेंस ॥ जैनेंघेतलेनैनवास ॥ बाकीराहिला
जोविशेष ॥ तोनेलानटानें ॥ १६ ॥ ऐसागाइत्रीचाविभाग ॥ अठराजातींनींघेतलासवेग ॥
त्यांतूनप्रथममांसभाग ॥ तीवांटणीपुरातन ॥ १७ ॥ ब्राह्मणाच्यातळ्यापासोन ॥ अतिशू
द्रमूळपुरुषसोमानाम ॥ दैवतशिवमारवाडदेशउत्तम ॥ ऋषीमार्कंडेयमहामुनी ॥ १८ ॥ ऐसे

॥१३॥

हेपांचवर्ण ॥ पांचपुरुषपांचऋषीपूर्ण ॥ पांचदेशपांचदेवसमसमान ॥ सांगीतलेतुजप्रती ॥
॥१९॥ मूळपुरुषपांचजणुं ॥ पांचवासोमास्वायंभुमनु ॥ तिसराधनपतीचौथानागाननु ॥ पां
चवासोमानामतयाचें ॥ २० ॥ मुळींऋषीश्रेष्ठ ॥ कश्यपवसिष्ठ ॥ शुक्राचार्यवरिष्ठ ॥ कश्य
पुपांचवामार्कंडेय ॥ २१ ॥ मूळदैवतेंपांच ॥ ब्रह्मारुद्रमहारुद्र ॥ विष्णुआणिशिव ॥ हींपां
चार्चीपांचदैवतें ॥ २२ ॥ मुळींपांचदेशमिथुळदेश ॥ माळवाअथर्वणवेददेश ॥ तिसराकर्ना
टकचौथागुजराथदेश ॥ पांचवामारवाडदेशजाणिजे ॥ २३ ॥ ऐसापांचवर्णांचामूळस्वधर्म ॥
त्याप्रकारेंआपलेंकर्म ॥ सांगीतलेंमूळवर्म ॥ चालवावेंपांचांनीं ॥ २४ ॥ ऐसेंहेंगाइत्रीपुराण ॥
व्यासासीसांगीतलेंनारदानें ॥ तेंम्यांव्यासमुखेंकेलेंश्रवण ॥ तुजसांगीतलेंपरीक्षिती ॥ २५ ॥
इतिश्रीगाइत्रीपुराण ॥ विधीससांगेनारायण ॥ शुकसांगेपरीक्षितीलागून ॥ द्वादशोऽध्याय
गोडहा ॥ २६ ॥ १२ ॥ ॥ छ ॥ ॥ ॥ छ ॥ ॥ ॥
श्रीगणेशायनमः ॥ शुकाप्रतीपरीक्षिती ॥ पुसतसेकरूनीविनंती ॥ पांचवर्णयज्ञोपवीतघा
लिती ॥ न्यासमंत्रकोणतासांगीतला ॥ १ ॥ यज्ञोपवीततुटतां ॥ अथवानवेंघालितां ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मूळपुरुषनेमतत्वता ॥ पांचांसीकोणतेसांगीतले ॥ २ ॥ शुकह्मणेपरीक्षिती ॥ पांचांचेपांच
मंत्रतुजप्रती ॥ सांगेनपरीगुप्तरीती ॥ मनामाजीठेविजे ॥ ३ ॥ पांचऋषींनींपांचजणांसीं ॥
ब्रह्मयानेंदीधलेंगाइत्रीमंत्रासी ॥ तेआचरलेस्वधर्मासी ॥ पांचांनींपांचमंत्रजपावे ॥ ४ ॥ यज्ञोप
वीततुटतां ॥ तोमंत्रजपावातत्वतां ॥ स्नानकरूनीगळांघालितां ॥ तीनवेळामंत्रह्मणावा
॥ ५ ॥ यज्ञोपवीतमुष्टीमाजीधरोन ॥ हागाइत्रीमंत्रजपावाआपण ॥ एकोत्तरशेंमंत्रपूर्ण ॥
बीजन्यासमातृकासहितजपावा ॥ ६ ॥ नित्यस्नानकरोन ॥ हागाइत्रीमंत्रजपोन ॥ एको
त्तरशेंजाण ॥ आपुलास्वधर्मकरावा ॥ ७ ॥ जानवेंनूतनघालितां ॥ तीनवेळांजपावातत्वतां ॥
न्यासबीजमातृकासहित ॥ जपोनीगळांघालिजे ॥ ८ ॥ तेमंत्रपांचऋषींनीं ॥ सांगीतलेपां
चजणांलागूनी ॥ दुजेतीनलोकभुवनीं ॥ नाहींतगापरीक्षितीराया ॥ ९ ॥ कश्यपऋषी
येऊन ॥ सहदेवब्राह्मण ॥ सांगतदेवआज्ञावेऊन ॥ तो मंत्रपूर्णऐकआतां ॥ १० ॥ मंत्र ॥
ॐनमोब्रह्मगायत्रीक्रंक्रांक्रींक्रुंक्रोंॐ-हौंअंगुष्ठाभ्यांनमः ॥ ११ ॥ ममगाइत्रीसोहंब्रह्मब्रह्म
णोब्रह्मकर्मभिः ॥ ॐलघुब्राह्मणहामंत्रबोलणें ॥ वसिष्ठावेंस्वयेंह्मणणें ॥ देवआज्ञेनेंसांगी

तला ॥ १२ ॥ ॐनमोमहागाइत्रीब्रंब्रांब्रींब्रुंब्रोंॐसोहंनेत्रायनमः ॥ ॐनमोगाइत्रीनमः
॥ १३ ॥ हाक्षत्रियांचामंत्र ॥ आतांवैश्यांचापवित्र ॥ बृहस्पतीनेंसांगितलासाचार ॥ धनप
तीनेंइंद्रआज्ञाघेऊन ॥ १४ ॥ ॐनमोहीगाइत्री ॥ ग्रंग्रांग्रींग्रुंग्रों ॐनमोहृदयायनमः ॥ ॐ
नमोगौतमी ॥ ॐकंनमः हाचीवैश्याचामंत्र ॥१५॥ आतांशूद्रांचा ॥ शुक्राचार्यनागानुनाम ॥
विष्णुआज्ञेनेंसांगितलें ॥ १६ ॥ ॐनमोशक्रगाइत्री ॥ घ्रंघ्रांघ्रींघ्रुंघ्रों ॐजंघायेनमः ॥ ॐव
सिष्ठायनमः ॐछंनमः ॥ हाशूद्रांचा ॥ १७ ॥ अतिशूद्रांचासविस्तर ॥ वर्णिलात्यांतजोडू
नकर ॥ शंकरआज्ञेवरूनी ॥ प्रमाणजाहलेंत्यानरा ॥ १८ ॥ ॐनमोविश्वबीजे ॥ भ्रंभ्रांभ्रीं
भ्रुंभ्रों ॐश्रीललाटायनमः ॥ यक्षावती ॐज्ञांनमः ॥ १९ ॥ ऐसेपांचमहामंत्र ॥ हेपांचव
र्णांसपवित्र ॥ पांचगाइत्रीन्यासबीजांसहितसमग्र ॥ मूळापासोनसांगितल्या ॥ २० ॥ हेंचि
संध्येचेंबीज ॥ सकलहोमाचेंकाज ॥ देवपूजेचेंनिज ॥ मंत्रहेगाइत्री ॥ २१ ॥ शुकह्मणेपरी
क्षितीनाथा ॥ न्यासबीजांसहिततत्वतां ॥ तुजसांगितलेंआतां ॥ प्रकटनकरावें ॥ २२ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इतिश्रीगाइत्रीपुराण ॥ विधीससांगेनारायण ॥ शुकसांगेपरीक्षितीलागून ॥ त्रयोदशो ऽध्यायगोडहा ॥ २३ ॥ १३ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ७ ॥
श्रीगणेशायनमः ॥ परीक्षितीह्मणेस्वामीशुका ॥ तुह्मींबीजासहीतमातृका ॥ सांगावीआह्मां भाविकां ॥ कृपाकरूनीएकदांची ॥ १ ॥ स्वामीयामंत्रापासून ॥ पूर्वीपेटतहोताअग्न ॥ या हीमंत्रेंकरून ॥ पर्जन्यवृष्टीहोतअसे ॥ २ ॥ याचमंत्रेंकरून ॥ प्रत्यक्षदेवयेऊन ॥ हेंवर्ममज लागोन ॥ कैसेंस्वामीमजसांगा ॥ ३ ॥ शुकह्मणेपरीक्षिती ॥ ब्राह्मणप्रतिदेवनिश्चिती ॥ अ नुष्ठानमध्यरात्रीं ॥ करीतहोते ॥ ४ ॥ महासमुद्रांतून ॥ मच्छआणितीमंत्रेंकरून ॥ त्यांचे भागतीनकरून ॥ तीनठायींतीनपैं ॥ ५ ॥ मध्यभागभक्षिती ॥ दोनभागपुनःजोडिती ॥ मं त्रबोलूनसजीवकरिती ॥ देतसोडूनसमुद्रामाजी ॥६॥ हेमंत्रआदिभूत ॥ परीविप्रेंकेलाअनर्थ ॥ पांचजणांचेबीजसहितमंत्र ॥ ठकवूनघेतले ॥ ७ ॥ ज्याचीवस्तुत्यापार्शीअसतां ॥ गुणायेते तत्वतां ॥ एकाचेंएकेंहरितां ॥ फलप्राप्तित्यासीकैंची ॥ ८ ॥ ह्मणोनवश्यनहोतीब्राह्मणांसी ॥ वश्यहोतोज्याचेत्यासो ॥ वैश्यशूद्रांचेघेउनीमंत्रासी ॥ आपल्यास्वार्थासीलाविले ॥ ९ ॥

वैश्यशूद्रांचेमंत्रठकवून ॥ आपल्यामंत्रांदूषणलावून ॥ आपलेहीत्यांसमानकरून ॥ दीनहो ऊनबैसले ॥१०॥ असोपरमेश्वराउचित ॥ पांचवर्णासीमंत्रदेत ॥ त्याचेब्रीदासीउणेंआणित ॥ आपणभोगीतसर्वमंत्र ॥ ११ ॥ ह्मणोनीमंत्रांचेंतेज ॥ गेलेंसकलकर्मीचेंकाज ॥ आतांक रितीगजबज ॥ व्यर्थचोजदाविती ॥ १२ ॥ इतिश्रीगाइत्रीपुराण ॥ विधीससांगेनारायण ॥ शुकसांगेपरीक्षितीलागून ॥ चतुर्दशोऽध्यायगोडहा ॥ १३ ॥ १४ ॥ ॥ ७ ॥
श्रीगणेशायनमः ॥ शुकह्मणेपरीक्षिती ॥ चारयुगेंसंपूर्णहोती ॥ तेव्हांगाइत्रीविष्णुसदनाप्रती॥ जाईलमाघारी ॥ १ ॥ कृतयुगामाजीजाण ॥ राहतहोतीवैकुंठभुवन ॥ विष्णुशेजारींस्था न ॥ तिचेंहोतें ॥ २ ॥ त्रेतायुगामाजीजाण ॥ गाइत्रीहोतीसत्यलोकींपूर्ण ॥ ब्रह्मयाचेंसदन॥ रहातहोती ॥ ३ ॥ द्वापारयुगामाजीजाणा ॥ कैलासींहोतीशिवसदना ॥ शिवापार्शींस्था न ॥ पृथ्वीरूपधरोनी ॥ ४ ॥ यावरीकलीमाजीगाइत्रीनें ॥ पृथ्वीरूपधरून ॥ पाताळींमुख करून ॥ राहिलीअसेअदृश्य ॥ ५ ॥ पृथ्वीचेंचर्मजाण ॥ त्यावरीअवघेजन ॥ मेरूमांदारगि रिद्रोण ॥ शिंगेंजाणगाइत्रीचीं ॥ ६ ॥ ऐशोआदिमातागाइत्रीसती ॥ असावीसकलजनाप्र

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

ती ॥ पृथ्वीवरीनिचेष्टवागती ॥ रूपधरुनीगाइत्रीपैं ॥ ७ ॥ मुखकरोनीखालीं ॥ पाताळींपहा
तमाउली ॥ त्याचाअर्थसकळी ॥ तुजसांगतोंराजेंद्रा ॥ ॥ ८ ॥ कलीअसेपाताळांत ॥ शेषा
ची आज्ञावाहत ॥ तोवटवृक्षींबंधनांत ॥ ढळढळीतउभाअसे ॥ ९ ॥ तोशेवटींसुटतां ॥ एक
वर्णहोयतत्वतां ॥ तेनपाहवेंतरीमाथा ॥ पाताळींदडपिला ॥ १० ॥ गाइत्रीचेपृष्ठीवरी ॥
जनवसतीपरोपरी ॥ नानाप्रकारेंपातककरी ॥ परीनपाहेमाउलिये ॥ ११ ॥ मलमूत्रकरिती
पृथ्वीवरी ॥ पातकेंहोतीनानापरी ॥ परीदुःखशोकांतधरित्री ॥ कदाकाळींनपडेची ॥ १२ ॥
पांचवर्णांतअतिशूद्रविख्यात ॥ ज्यानेंरक्षणकेलीपोटांत ॥ तोभूमीचापुत्रसत्य ॥ अधिकारी
सर्वांत ॥ १३ ॥ इतरजनमांसभक्षिती ॥ परीगाइत्रीचाद्वेषकरिती ॥ चांडालदुरात्मेनि
श्चिती ॥ उन्मत्तत्यासीअधिकारकैंचा ॥ १४ ॥ ह्मणोनीअतिशूद्रबळकट ॥ गाइत्रीसठावके
लापोटांत ॥ ह्मणोनीपृथ्वीअधिकारदेत ॥ मुळापासोनीअतिशूद्रांसी ॥ १५ ॥ मगपरीक्षि
तीह्मणेशुकासी ॥ कोणताअधिकारअतिशूद्रांसी ॥ तोसांगावानिश्चयेंसी ॥ कृपाकरोना
स्वामीपैं ॥ १६ ॥ शुकसांगेपरीक्षितीराया ॥ अतिशूद्राचीऐकचर्या ॥ जेकांध्वनीनाम

माया ॥ तेउदरामाजीठेविती ॥ १७ ॥ जोनिर्गुणनिराकार ॥ निष्कलंकब्रह्मगोल ॥ त्या
नेंअवतारज्यावेळींघेतला ॥ त्याचवेळींध्वनीउठली ॥ १८ ॥ तीचित्कळाआदिशक्ती ॥
गुणासआलीनामक्षिती ॥ तीहेसगुणगाइत्रीह्मणती ॥ घेतलीवस्तीअतिशूद्राघरीं ॥ १९ ॥
कृपालूहोउनीमाउली ॥ अक्षयवरदेतीजाहली ॥ ह्मणेतुह्मींआशाधरिली ॥ अधिकारअसे
तुह्मां ॥ २० ॥ तेह्मणालजरीकोण ॥ ऐकासांगतोंनिवडोन ॥ मृत्युपावतीचारीवर्ण ॥ ब्राह्म
णक्षत्रियवैश्यशूद्रअतिशूद्र ॥ २१ ॥ तयांसोजागावांटोन ॥ द्यावीअतिशूद्रानें ॥ त्याचेआज्ञे
वांचून ॥ प्रेतदहनकरूंनये॥२२॥चारहातलांबजाण ॥ तीनहातरुंदीप्रमाण ॥ तीनटक्कद्रव्यदेऊ
न॥नेमोनीजागादेइजे ॥ २३ ॥ मोहोरअथवारुपेंसोनें ॥ अथवातांब्याचेपैसेपूर्ण॥ तीनटक्केघे
तल्यावांचून ॥ नजाळावेंप्रेतकदा ॥ २४ ॥ त्यानेंद्यावीरेघओढून ॥ रेघेआंतकरावेंदहन ॥
त्यासींविन्मुखकरितांजाण ॥ वंशखंडनहोयत्याचा ॥ २५ ॥ राजारंकमृत्युपावला ॥ तरीती
नटक्कत्याला ॥ त्यापासोनीभूमिआपणाला ॥ मोजोनघेतांदोषनाहीं ॥ २६ ॥ त्यानेंरेघवो
ढोन ॥ त्यारेघेआंतप्रेतदहन ॥ नाहींतरीदोषदारुण ॥ झगटेअंगींकर्त्याच्या ॥ २७ ॥ सक

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

व्दराजेराज्यकरिती ॥ परीपृथ्वीअतिशूद्राचीनिश्चिती ॥ हेंअसत्यवसेज्याचेचित्तीं ॥ अंतींत्या
सींकुंभीपाक ॥ २८ ॥ ऐसेंभूमीचेंवरदान ॥ आहेअतिशूद्रालागून ॥ जोकरीयासीअनुमान ॥
तोपूर्णवैरीविष्णूचा ॥ २९ ॥ इतिश्रीगाइत्रापुराण ॥ विधीससांगेनारायण ॥ शुकसांगेपरी
क्षितीलागून ॥ पंचदशोऽध्यायगोडहा ॥ ३० ॥ १५ ॥ ॥ ७ ॥
श्रीगणेशायनमः ॥ शुकह्मणेपरीक्षितीराजा ॥ सोमवंशींविजयध्वजा ॥ अद्यापअतिशूद्रपूजा॥
करितीजाणापृथ्वीची ॥ १ ॥ चौथीगाइत्रीजाण ॥ हेचीअतिशूद्राचीपूर्ण ॥ बीजन्यासांस
हितजाण ॥ दिधल्याऋषीनें ॥ २ ॥ त्यांतहेमुख्यपूर्ण ॥ धरत्रीरूपहोऊन ॥ गाइत्रीआपण
जाण ॥ बैसलीसे ॥ ३ ॥ ह्मणोनीभूमिभागअतिशूद्रासी ॥ चारीवर्णेंद्यावेत्यासी ॥ अटरा
यातींच्यामार्गासी ॥ नकरावेंसांगअनेककांहीं ॥ ४ ॥ भूमिभागतीनटक्केघेतल्यावीण ॥
करूंनद्यावेंप्रेतदहन ॥ हीवेदमर्यादासोडून ॥ आणिकमार्गनकरावा ॥ ५ ॥ राजारंकसाधूअ
ठरावर्ण ॥ जागाद्यावीत्यांलागून ॥ परीतीनटक्केघेतल्यावीण ॥ प्रेतदहनकरूंदेऊंनये ॥ ६ ॥
जेद्रव्यवानश्रीमंत ॥ तेसुवर्णाचेहोनदेत ॥ जेयथाशक्तिप्रेमानेंदेत ॥ रुपेंहोनपैं ॥ ७ ॥ जेअ

तिदरिद्रीअसती ॥ त्यांसीद्रव्यद्यावयानाहींशक्ती ॥ मगतेयथाशक्तिदेती ॥ ताब्याचेहोन ॥
॥ ८ ॥ बाळाकृतीतारुण्यवृत्ती ॥ अथवावृद्धनिश्चिती॥तीनटक्केद्यावेआपलीकीर्ती ॥ नसांडा
वीसर्वथा ॥ ९ ॥ नमिळेजरीअतिशूद्र ॥ तोहीसांगतोंप्रकार ॥ भूमींतपुरावेंद्रव्यसाचार ॥ म
गदहनकरावें ॥ १० ॥ भूमीभागतीनटक्के ॥ त्याचेअतिशूद्रअधिकारीनिके ॥ तेनजाणोनी
लोकें ॥ होतीतवकेंवादासी ॥ ११ ॥ तोभूमिभागत्यानेंघ्यावा ॥ चारहातभूभागद्यावा ॥
ऐसाशास्त्राचाठेवा ॥ पुरातनअसेपरीक्षिती ॥ १२ ॥ जैसाप्रेताजवळीब्राह्मण ॥ मंत्रजपकरी
पूर्ण ॥ मगप्रेतकरितीदहन ॥ यथाविधिनें ॥ १३ ॥ तैसाप्रेताजवळी ॥ अतीशूद्रअसावाते
वेळीं ॥ त्यानेंमंत्रजपावातेकाळीं ॥ आज्ञाघेऊनीमगजाळावें ॥ १४ ॥ तीनमंत्रह्मणोन ॥ भूमी
सीतीनरेघाकाढुन ॥ तीनटक्केद्रव्यघेऊन ॥ त्यारेघेआंतभस्मकरावें ॥ १५ ॥ कंठाखालींरेघ
एक ॥ पायातळींदुसरीदेख ॥ सभोंवतालीतिसरीरेख ॥ वोढोनीमंत्रह्मणावा ॥ १६ ॥ तीन
मंत्रह्मणोनी ॥ तीनटक्केअथवाहोनघेऊनी ॥ चारीवर्णांपासूनी ॥ मगप्रेतदहनकरवावें ॥ १७॥
आज्ञाघेतल्यावांचून ॥ प्रेतासीलाऊंनयेअग्न ॥ त्याचीआज्ञाघेतांसुगमजाण ॥ परलोकींचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मार्गमिळे ॥ १८ ॥ शुकह्मणेपरीक्षितीराया ॥ ऐशीअतीशूद्रांचीचयो ॥ गाइत्रीचावरतया ॥ आपलाघ्यावाभूमिभाग ॥ १९ ॥ इतिश्रीगाइत्रीपुराण ॥ विधीससांगेनारायण ॥ शुकसांगेपरीक्षितीलागून ॥ षोडशोऽध्यायगोडहा ॥ २० ॥ १६ ॥ ॥ ॥ ७ ॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीरामचंद्रायनमः ॥ शुकह्मणेपरीक्षितीसी ॥ सर्वविचारसागीतला तुजसी ॥ आतांगाइत्रीपुराणाविषीं ॥ शंकाराहिलीसेंभासतें ॥ १ ॥ सकलप्रश्नांचेंउत्तर ॥ तुजसांगीतलेंसविस्तर ॥ तुझेंसमाधानपर ॥ झालेंकीनाहीं ॥ २ ॥ अनेकजरीअसतीलप्रश्न ॥ तरीमीकरीनत्यांचेंनिरसन ॥ तेंतूंएकाग्रचित्तींकरींश्रवण ॥ भक्तश्रेष्ठपरीक्षिती ॥ ३ ॥ परीक्षितीह्मणेशुकासी ॥ एकप्रश्नअसेतुह्मांसी ॥ जेव्हांतेदहनकरितीप्रेतासी ॥ जागात्यासीअतिशूद्रदेत ॥ ४ ॥ तरीत्यानेंकोणतेमंत्रतीन ॥ ह्मणावेमगकरावेंदहन ॥ हासंशयमाझाफेडोन ॥ टाकावास्वामी ॥ ५ ॥ ऐसेंपरीक्षितीचेंउत्तर ॥ ऐकोनीबोलेशुकयोगींद्र ॥ ह्मणेऐकराया प्रकार ॥ सांगतोंतुज ॥ ६ ॥ शुकह्मणेपरीक्षिती ॥ तीनमंत्रअसती ॥ तीनरेषासाक्षीती ॥ वोढोनीह्मणावे ॥ ७ ॥ प्रथममस्तकातळीं ॥ रेषादुसरीकंठाखालीं ॥ मंत्रह्मणोनियांत्यावेळीं॥

प्रेताभोंवतीओढावी ॥ ८ ॥ सभोंवत्यारेघेसपाहो ॥ तोचमर्यादाप्रेतासहोई ॥ आतायाचे मंत्रपाहीं ॥ सांगतोंतुज ॥ ९ ॥ ॐयमधर्मसिरोसीधरक्षममममआज्ञया ॥ हामंत्रह्मणोन ॥ मस्तकातळींरेघेओढोन ॥ त्यावरीद्रव्यठेवोन ॥ मगअतिशूद्रेंघेइजे ॥ १० ॥ ॐवृष्ठीतथाजं घरक्षीरक्षीत्रिदशेश्वरे ॥ हामंत्रह्मणोन ॥ दुसरीकंठाखालींरेघओढून ॥ त्यावरीद्रव्यठेवून ॥ मगअतिशूद्रेंघेइजे ॥ ११ ॥ ॐपदोपदीगतास्वर्ग ॥ शुकसांगेपरीक्षितीलागून ॥ हातिसरा मंत्रह्मणोन ॥ पायांतळींरेघओढोन ॥ त्यावरीद्रव्यठेवून ॥ अतिशूद्रेंघेइजे ॥ १२ ॥ मग भटपणाचालवून ॥ त्यानेंकरावेंप्रेतदहन ॥ हेमंत्रजरीआलेब्राह्मणालागून ॥ तरीअतिशूद्रा विणफलनाहीं ॥ १३ ॥ जैसेब्राह्मणाचेमुखेंमंत्र ॥ ह्मणोनीकरावीक्रियासमग्र ॥ तैसेहेतीन मंत्रपवित्र ॥ अतिशूद्रमुखेंचबोलावे ॥ १४ ॥ आणिकाजरीमंत्रआले ॥ तरीअतिशूद्रमुखेंच पाहिजेबोलिले ॥ त्यांवांचोनवेगळे ॥ कदाकाळींनह्मणावे ॥ १५ ॥ ऐसेंहेंगाइत्रीपुराण ॥ शुकसांगेपरीक्षितीलागून ॥ विधीससांगेनारायण ॥ हेंजोकरीलश्रवण ॥ धन्यतोहोय

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

संसारी ॥ १६ ॥ इतिश्रीगाइत्रीपुराण ॥ विधीससांगेनारायण ॥ शुकसांगेपरीक्षिती लागून ॥ सप्तदशोऽध्यायगोडहा ॥ १७ ॥ अध्याय ॥ १७ ॥ ॥ छ ॥

श्रीगणेशायनमः ॥ राजाह्मणेस्वामीशुका ॥ माझेमनींचीआशंका ॥ तुह्मीफेडिलीदेखा ॥ तारकमूर्तीसत्यतुह्मी ॥ १ ॥ तुजकायहोऊंउतराई ॥ माझ्याआशंकाफेडिल्यासर्वही ॥ आतां माझीकांहीं ॥ नाहींशंकासर्वथा ॥२॥ जेजेप्रश्नपुसले ॥ तेंतेतुवांसांगितले ॥ कृतार्थमजकेलें ॥ तुंवांतारिलेंमजलागीं ॥ ३ ॥ ऐशींपरीक्षितीचींवचनें ॥ ऐकोनीशुकानें ॥ बोलतसेपरीक्षिती लागून ॥ वचनएकपर्येसा ॥ ४ ॥ परीक्षितीसीह्मणेशुक ॥ हेंगाइत्रीपुराणदेख ॥ सर्वांपरीसु रेख ॥ महाअर्थवेदांसी ॥ ५ ॥ वेदांचेंजेंगुह्यजाण ॥ तेंहेंगाइत्रीपुराण ॥ सारकाढिलेंनिव टोन ॥ अनुपम्यसकळांसी ॥ ६ ॥ तुझेंविचित्रप्राक्तनह्मणोन ॥ प्राप्तजाहलेंजाण ॥ गाइत्री च्यामुखांतून ॥ विष्णुनारायणहवनकरी ॥ ७ ॥ विष्णुकृपाळूहोऊन ॥ सांगितलेंब्रह्मदेवा लागून ॥ ब्रह्मयानेंस्वपुत्राकडून ॥ अत्यादरेंऐकविलें ॥ ८ ॥ नारदेंव्यासालागून ॥ व्यासें सांगीतलेंमजसी ॥ मीउपदेशिलेंतुजप्रती ॥ परमगुह्यइतरांजें ॥९॥आणिकउपदेशपरीक्षिती ॥

सांगीतलासेनिश्चिती ॥ वैशंपायनेंजन्मेजयाप्रती ॥ गाइत्रीपुराणसांगितलें ॥ १० ॥ तेव्हां नैमिषारण्यांत ॥ शौनकादिकांसूतसांगत ॥ हेंगाइत्रीपुराणदैवत ॥ सकलब्रह्मकर्माचें ॥११॥ अठराजातीपांचवर्ण ॥ सकलांसीमान्यहेंपुराण ॥ हेंअर्चिलेंजरीनेमेंकरून ॥ तरीब्राह्मणतोते जस्वी ॥ १२ ॥ संध्यापुरातनदेवतार्चन ॥ मंत्रहवनविवर्जन ॥ जपध्यानअनुष्ठान ॥ यावीण समाधाननाहींपैं ॥ १३ ॥ संध्याकरितांह्मणावीगाइत्रीतत्वतां ॥ लघुकरितांआणिहिंडतां ॥ बसतांउठतांध्यानतत्वतां ॥ सोडूंनयेतियेचें ॥ १४ ॥ यज्ञोपवीतजरीघालणें ॥ तरीहेचमंत्र असणें ॥ मौंजीबंधनलग्नकरणें ॥ तरीहेचजपावीसर्वथा ॥ १५ ॥ यज्ञयागजपअनुष्ठान ॥ गा इत्रीमंत्रसर्वथामान्य ॥ न्यासबीजमातृकावीण ॥ कांहींचसाधननचाले ॥ १६ ॥ ऐसेंहेंगाइत्री पुराण ॥ अठराअध्यायजाण ॥ सांगितलेंपूर्ण ॥ येथूनसमाप्तजाहलें ॥ १७ ॥ हेंगाइत्री पुराण वेदांचेंबीजपूर्ण ॥ गाइत्रीस्वमुखेंकरून ॥ सांगतोंउद्धरलातेथोन ॥ ब्रह्मासायुज्यपद पावला ॥ १८ ॥ इतिश्रीगाइत्रीपुराण ॥ विधीससांगेनारायण ॥ शुकसांगेपरीक्षितीला गून ॥ अष्टादशोऽध्यायगोडहा ॥ १९ ॥ १८ ॥ ॥ ॥ ॥ ॥ छ ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीगणेशायनमः ॥ जन्मेजयापुसेवैशंपायना ॥ गाइत्रीचीकीर्तित्रिभुवना ॥ तरीहेंमाहात्म्यमज
लागून ॥ विदितकरादयाळा ॥ १ ॥ असोवैशंपायनपुसेजन्मेजयराजासी ॥ हेंमाहात्म्यसाग
तोंतुजसी ॥ शुकस्वामीनेंतुझ्यापित्यासी ॥ सांगितलेंसविस्तर ॥ २ ॥ जन्मेजयाससांगेवैशं
पायन ॥ आतांतूंस्वस्थकरींमन ॥ एकाग्रचित्तदेऊन ॥ गाइत्रीमाहात्म्यपरियेसीं ॥ ३ ॥
जीयागयोगांचीमाउली ॥ जीकांएकवीसस्वर्गावरतीराहिली ॥ तीहीमृत्युलोकींआली ॥ रक्षि
तीझालीचराचर ॥ ४ ॥ एकदांएकवीसस्वर्गावरोनी ॥ उतरलीब्रह्मदेवाचेसदनीं ॥ मंत्रबो
ललीशतगुणी ॥ तेणेंपावनत्रिभुवन ॥ ५ ॥ ऐसेंगाइत्रीमाहात्म्य ॥ उत्तमामाजीउत्तम ॥
बेचाळीसयातीतिजपासून ॥ असतीनिर्माणजाहल्या ॥ ६ ॥ अतिशूद्रांसीदिधलावर ॥ तो
अद्यापिचालतोसाचार ॥ अतिशूद्रांचासंसार ॥ गाइत्रीपासूनजाणपां ॥ ७ ॥ गाइत्रीअस
तांअतिशूद्रांचेघरीं ॥ दुग्धपानअहोरात्रीं ॥ तीजरीयेतांब्रह्मयाचेघरीं ॥ दुग्धनपेकिंचित ॥
॥ ८ ॥ कलियुगामाजीगाइत्री ॥ वसतसेअतिशूद्रांचेघरीं ॥ मृत्युपावलोयाजरी ॥ तरीत्याचे
उदरींजागाघेत ॥ ९ ॥ तिचेमस्तकींगोरोचन ॥ अद्यापवसेस्वर्गाचीखूण ॥ प्राप्तीहोय

अतिशूद्रांलागून ॥ परीतेंनकळेअभाग्या ॥ १० ॥ तेंगोरोचनमिळतांब्राह्मणांसी ॥ अतिउ
त्तमप्राप्तितेद्विजांसी ॥ ह्मणतीदुर्लभवस्तुआह्मांसी ॥ अतिसायासेंप्राप्तजाहली ॥ ११ ॥ मग
करूनीमंगलस्नान ॥ मस्तकींतिलकलावून ॥ परमआनंदभरितहोऊन ॥ होतीनिमग्नजप
ध्याना ॥ १२ ॥ उगाचजरीमस्तकींलाविलें ॥ ओंवळेंतेंसोवळेंजाहलें ॥ स्नानजरीनाहीं
केलें ॥ तरीतोशुद्धसोंवळा ॥ १३ ॥ गाइत्रीजाउनीपाताळासी ॥ घेउनीआलीतुळसीसी ॥
तीदिधलीविष्णूसी ॥ आपुलाजामातह्मणोनी ॥ १४ ॥ शिवासीदेतविभूती ॥ ब्रह्मदेवास
यज्ञोपवीत ॥ कुंडलेंलववोनीकर्णांत ॥ पवित्रकेलीभागीरथी ॥ १५ ॥ चरणनलागतांअं
बरासी ॥ निळारंगचढलानभासी ॥ हेंमाहात्म्यगाइत्रीपासीं ॥ कितीह्मणोनवर्णावें ॥ १६ ॥
ऐसेंगाइत्रीआख्यान ॥ जन्मेजयाससांगेवैशंपायन ॥ एकोणीसअध्यायगोडपूर्ण ॥ पुढें
चरित्रपरिसोत ॥ १७ ॥ १९ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥
श्रीगणेशायनमः ॥ वैशंपायनह्मणेजन्मेजयासी ॥ गाइत्रीमाहात्म्यपरियेसीं ॥ सर्वांतश्रेष्ठ
तेजोरासी ॥ जैसेंआकाशींसूर्यबिंब ॥ १ ॥ असोएकदागाइत्री ॥ गेलीब्रह्मयाचेद्वारीं ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सकलक्षीरसागरीं ॥ हाकमारितीनिर्गुण ॥ २ ॥ तेव्हांगाइत्रीचीआज्ञापाळोन ॥ निर्गुणा
नेंरूपधरिलेंसमुण ॥ नामरूपआकारोन ॥ केलेंधांवणेंभगवंतें ॥ ३ ॥ मगदशरथात्मज
होऊन ॥ मारिलादशग्रीवरावण ॥ सवेंचीगोकुळींयेऊन ॥ कंसदैत्यमर्दिला ॥ ४ ॥ ऐसें
गाइत्रीमाहात्म्यपूर्ण ॥ वर्णितांकुंठितत्रिभुवन ॥ ब्रह्माविष्णुमहेशपूर्ण ॥ तिचेआंगींचीकांतो
पैं ॥ ५ ॥ गाइत्रीचेंकरितांमंत्रध्यान ॥ उल्हासयुक्तहोयमन ॥ जीउतरलीएकवीसस्वर्गा
वरून ॥ प्रथमविष्णूचेद्वारीं ॥ ६ ॥ विष्णूनेंतेवेळांपाताळीं ॥ बळिराजेंस्थापिलाकली ॥
सहबंधनकरविला ॥ वृक्षासीतेवेळांगाइत्रीनें ॥७॥ तेथोनिनेलीइंद्रभुवनीं ॥ इंद्रनओळखितांतिज
लागुनी ॥ मगक्रोधावलीजगज्जननी ॥ इंद्रताडिलाशापशस्त्रें ॥८॥ ह्मणेमृत्युलोकींमानवराजा॥
जन्मेजयविख्यातभुजा ॥ तोतुझीकरीलपूजा ॥ सर्पसत्रींजाणिजे ॥ ९ ॥ त्याशापेंजन्मेजया ॥
तक्षकइंद्रपाठीसीघालोनियां ॥ तक्षकासहितखालींआणोनीयां ॥ दुःखत्याणेंभोगिलें ॥
॥ १० ॥ मगगेलीयमलोकासीं ॥ यमेंदेखतांचगाइत्रीसी ॥ तत्काळआसनदेउनीतिसीं ॥
करजोडूनीविनवीत ॥ ११ ॥ मगकृपाळूहोऊन ॥ कवचकुंडलेंयमासीदेऊन ॥ मगनिघाली

झडकरीतेथून ॥ सप्तपाताळींपैंगेली ॥ १२ ॥ ऐसेंभ्रमणकरितां ॥ वसिष्ठआश्रमाआली
माता ॥ अठराछंदनिर्माणकरितां ॥ पळताझालाविश्वामित्र ॥ १३ ॥ मगआलीजमदग्नी
पाशीं ॥ मारविलेंसहस्रार्जुनासी ॥ निक्षेत्रीकरविलेंआपणासी ॥ योगायोगींऐसाप्रकार ॥
॥ १४ ॥ ब्रह्मदेवासकृपाळूपणें ॥ यज्ञोपवीतदिधलेंतिनें ॥ सोमवंशींसोमानामेंजाण ॥ अति
शूद्राउदरींराहिली ॥ १५ ॥ अद्यापिकलियुगींजाण ॥ ब्राह्मणाचात्यागकरून ॥ प्रचीतीन
चमंत्रासीह्मणोन ॥ होमहवनसफलहोतनाहीं ॥ १६ ॥ काशीक्षेत्रींअंत्यजाघरीं ॥ दयाकरो
नीत्यावरी ॥ राजाकरोनीभिकारी ॥ सेवेसीलावीतयाच्या ॥ १७ ॥ यावरीएकेदिनीं ॥
आत्मलिंगनेलेंरावणीं ॥ मगगाइत्रीयेउनी ॥ गोकर्णींराहिली ॥ १८ ॥ पाताळासींजाईल
ह्मणोन ॥ रावणेंपिळिलागाइत्रीचाकर्ण ॥ मगतिनेंरामचंद्राकडोन ॥ कुळक्षयकरविला ॥
॥ १९ ॥ ऐसीवेदमातागाइत्री ॥ त्रिभुवनींतिचीथोरी ॥ तिचेंमाहात्म्यवैखरी ॥ कितीह्मणो
नसांगावें ॥ २० ॥ हेंब्रह्मांडपुराणाचेंज्ञान ॥ गाइत्रीमाहात्म्यजाण ॥ याचाराखिजेमान ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

गाइत्रीप्रसन्नतयासी ॥ २१ ॥ इतिश्रीगाइत्रोपुराण ॥ जन्मेजयासर्सिसांगेवैशंपायन ॥ श्रोते
होऊनियांसावधान ॥ विसावाअध्यायगोडहा ॥ २२ ॥ अध्याय ॥ २० ॥ ॥ ॥ छ ॥
श्रीगणेशायनमः ॥ जन्मेजयासीपुसेवैशंपायन ॥ काळीकपिलागाइत्रीजाण ॥ वसिष्ठाश्रमीं
येऊन ॥ उभीराहिलीनावेक ॥ १ ॥ वसिष्ठानेंदर्भमंत्रून ॥ गाइत्रीच्यामुखींदेऊन ॥ साष्टांग
नमस्कारकरून ॥ स्तवनकरीतियेचें ॥ २ ॥ तोदर्भमुखींधरून ॥ तीकाशीक्षेत्रींआलीआ
पण ॥ तेथेंकेलेंहोमहवन ॥ अद्यापपूर्णआहेक्रिया ॥ ३ ॥ ऐसेंगाइत्रीमाहात्म्य ॥ सकलांमा
जीअसेउत्तम ॥ तेचीत्रिवेणीसंगम ॥ निर्माणकेलें ॥ ४ ॥ तिचेंनांवत्रिवेणी ॥ तीर्थनेमिलेंब्र
ह्मदेवानें ॥ अठराकोटीतीर्थेंजाण ॥ पृथ्वीवरीविख्यात ॥ ५ ॥ तितकींचगाइत्रीचींनामें
जाण ॥ पृथ्वीरूपधरून ॥ दैवेंधरिलेंमौन ॥ अवताराकारणेंकलियुगीं ॥ ६ ॥ कलियुगींगा
इत्रीचेंघर ॥ प्रत्यक्षकाशीक्षेत्र ॥ जेथेंपिंपळाचापार ॥ त्यावरीउभीअसे ॥ ७ ॥ भाविकभक्त
जन ॥ त्यांचेदृष्टीपडेजाण ॥ कलियुगसंपतांपूर्ण ॥ ब्रह्मलोकासींजाईल ॥ ८ ॥ त्यापिंपळ
पत्रावरी ॥ बालरूपआहेश्रीहरी ॥ त्याचवृक्षाचेपारीं ॥ असेगाइत्रीतीर्थ ॥ ९ ॥ जेकोणीपु

ण्यवंतप्राणी ॥ शब्दऐकूंयेततयांकांनीं ॥ श्रुतनहोयउन्मत्तकर्णीं ॥ आणिकपापिजना ॥१०॥
सोमवाराचेदिवशीं ॥ रात्रीचेप्रथमप्रहरासी ॥ ध्वनीउमटतनिशीं ॥ श्रवणकरीतसंतभक्त ॥
॥ ११ ॥ सोंगभीरसोंगभीर॥ऐसाशब्दउठेवारंवार॥ हापांचीवर्णाचाअध्यायसाचार ॥ ब्रह्मांडपु
राणाचासारअसे ॥ १२ ॥ ऋग्वेदयजुर्वेदसामवेद ॥ चौथाअथर्वणवेद ॥ गीर्वाणभाषाअर्थप्र
सिद्ध ॥ मुख्यवेदबोलती ॥१३॥ वेदार्थीपारनलागेसाचार ॥ मगब्रह्माविष्णुशंकर ॥ यांनीं
काढिलासार ॥ सत्यजाणजन्मेजया ॥ १४ ॥ मगमिळोनीतिघेजण ॥ पांचमंत्रवांटोन ॥ देत
पांचवर्णालागोन ॥ वेदवाणीअसेही ॥ १५ ॥ ऐसेंगाइत्रीमाहात्म्य ॥ तीनअध्यायउत्तम ॥
सकलब्रह्मांडपुराण ॥ तीनअध्यायींआटलें ॥ १६ ॥ स्नानकरोनीस्वस्थचित्तें ॥ प्रातःका
ळींपाठकरितां ॥ एकमंडळनित्यवाचितां ॥ उत्तमकुळींजन्मपावे ॥ १७ ॥ हेंगाइत्रीमाहा
त्म्यजाण ॥ पांचवर्णाचेंदैवतपूर्ण ॥ तीनअध्यायप्रत्यक्षजाण ॥ ब्रह्माविष्णुमहेश ॥ १८ ॥
तीनअध्यायनित्यपढतां ॥ त्यानेंपूजिलीगाइत्रीमाता ॥ ब्रह्मकर्मतत्वतां ॥ येतहातासक
लही ॥ १९ ॥ जन्मेजयाससांगेवैशंपायन ॥ हेंकरितांश्रवणपठण ॥ निदध्यासनअनुदिन ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

परमप्रीतीकरितांग्रंथरक्षण ॥ फळसमानसर्वांसी ॥ २० ॥ षण्मासकरितांआवर्तन ॥ सर्वसं
कटेंजातीनिरसोन ॥ भावेंहोईलत्रिकाळज्ञान ॥ नाहींकारणअभाविकांचें ॥ २१ ॥ हेंगाइ
त्रीपुराण ॥ त्रिभुवनीचेंअमौल्यरत्न ॥ जन्मेजयासांगेवैशंपायन ॥ धन्यअसेगाइत्रीमंत्र ॥२२॥
स्कंधपुराणींकथासूत ॥ शुकादिकांप्रतीसांगत ॥ हेंऐकतांदोषसमस्त॥ दग्धहोतीक्षणार्धें॥२३॥
याचाजोमानीलअविश्वास ॥ होईलतोअल्पायुषीतामस ॥ चांडाळतोनिःशंक ॥ त्या
चाविटाळनव्हावा ॥ २४ ॥ हाग्रंथआम्रवृक्षसुरस ॥ पद्यरचनाफळेंआलींपाडास ॥ कुतर्क
वादीजेवायस ॥ मुखरोगीत्यांसनावडती ॥ २५ ॥ इतिश्रीगाइत्रीपुराणसमाप्त ॥ शकेसोळाशें॥
शुद्धपौर्णिमामाघमास ॥ सोमवारींग्रंथसंपविला ॥ अध्याय ॥ २१ ॥ समाप्त ॥ श्री ॥ ॥

प्रिंटर केशव वामन पाठक
'जगदीश्वर' छापखाना गिरगांव गायवाडी घर नं. २ मुंबई.
प्रकाशक,
पंढरीनाथ विनायक पाठक मोतीबाजार नं. २ मुंबई.
शके १८३३, सन १९११.

हीं व इतर सर्व प्रकारचीं पुस्तकें माफक दरानें विकत मिळतील.
बाळकृष्ण लक्ष्मण पाठक
बुकसेलर आणि पब्लिशर.
मोतीबाजार नं. २ मुंबई.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ इति गाइत्रीपुराण समाप्त ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥श्री ॥

॥श्रागणे शायनम ः॥अथेवेश्वदेव
॥प्रयोगः॥आचम्य प्राणायम
॥संङ्कल्पः॥ अद्य पुर्वो चरित एवंगुण
॥विशेषण विशिष्टायां शुभ पुण्यतिथो
॥मम देह सुतजनित समस्त दोष परि
॥हार पुर्वं नित्यकर्मानुष्ठान सिद्धिद्वा
॥रा श्री परमेश्वर प्रीत्यर्थं पंचमहा
॥येसे रहं यस्ये ॥ॐ चत्वारि शृंङ्गा त्रय
॥यो ऽ अस्य पादा द्वे शीर्षे सप्त हस्तासो
॥अस्य त्रिधा बद्धो वृशभो रोरवीति महो
॥देवो मर्त्यं ऽ आविवेश ॥ॐ एवाहेद
॥वः प्रदिशोनुसर्वाः पुर्वेहि जाताः स ऽ
॥उगर्भे अंतः स ऽएव जातः सजनिष्य
॥माणः प्र संजना स्तिश्रति स र्वा मुखः
॥मुखं यः सर्वदेवा नव्य भुक्व्य भुक्तथा

॥पितृभ्यो नमस्तेमे विष्णवेपावकाय्यने
॥पावक नाम्नेवैश्वानरायनमः ॥अग्नं
॥नमः अग्नये गंधं नमः अग्नये अक्षता
॥स्पुष्पं च नमः ॥अग्नये नमो नमः ॥अग्ने
॥शांण्डिल्य गोत्र मेषध्वज प्राङ्मुख संमुखो
॥भव तत ः प्रदक्षिणमग्निं पर्युक्ष्य उत्तर
॥था तदा वृत्ति ः मध्यमानामिका ङ्गुष्ठै
॥र्घृत मा क्षिनो दक्षस्य बदरी फल प्रमाणः
॥कुण्ड स्था ग्नावा हुतीर्जुहुयात् यथा
॥॥१॥ॐ भुः स्वाहा रदम ग्नये नमम ॥२॥
॥ॐ भुवः स्वाहा रदं सूर्याय नमम ॥३॥ वायवे
॥ॐ स्वः
॥भुवः स्वाहा रिदं ~~वायवे~~ नमम ॥४॥ॐ स्वः सूर्याय
॥~~स्वाहा रदं सूर्याय नमम~~ ॥ॐ भु र्भुवः स्वाहा
॥रिदं प्रजापतये नमम ॥५॥ॐ देव कृत स्ये
॥नसो वय जन मसि स्वाहा रिदमग्नये नमम
॥६॥ॐ मनुष्य कृत स्ये नसो वय जनमसी
॥स्वाहा रिदम ग्नये नमम ॥७॥ॐ पितृ कृत
॥स्ये नसो वय जनमसी स्वाहा रिदमग्नये नमम
॥८॥ॐ आत्म कृत स्ये नसो वय जनमसी स्वाहा
॥रिदमग्नये नमम

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

[OrderDescription]
,CREATED=27.08.19 14:53
,TRANSFERRED=2019/08/27 at 15:02:04
,PAGES=28
,TYPE=STD
,NAME=S0001550
,Book Name=M-696-GAYTRI PURAN
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF
,FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF
,FILE28=00000028.TIF
,

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection